अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

जाहिरातबाजीवर शिंदे-फडणवीस सरकारचा ४२ कोटींचा खर्च

मुंबई : काही महिन्यांपूर्वी ठाकरे सरकारला बाजूला सारुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपसोबत जात नवं सरकार बसवलं. सत्तेत आल्यापासून शिंदे-फडणवीस सरकारनं जाहिरातबाजी करण्यात कुठलीही कसर सोडली नसल्याचं माहिती अधिकाराच्या अंतर्गत मिळालेल्या माहितीतून स्पष्ट झालं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रात त्यांचे सरकार स्थापन झाल्यापासून फक्त ७ महिन्यात जाहिरातींसाठी शासनाच्या तिजोरीतून तब्बल ४२ कोटी ४४ लाख रुपये खर्च केल्याची धक्कादायक माहिती मला माहिती अधिकारात प्राप्त झाली आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते नितीन यादव यांनी ही माहिती शासनाच्या माहिती जनसंपर्क विभागाकडे मागितली होती. त्यांनी म्हटलं आहे की, नुकतेच राज्य शासनाकडून हे देयके मला उपलब्ध झाली. यात धक्कादायक माहिती अशी की, या खर्चाची सरासरी काढली तर दिवसाला जवळपास १९ लाख ७४ हजार रुपये जनतेच्या खिशातील शासकीय पैशाची वारेमाप उधळपट्टी केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या खिशातून शासनास जाणाऱ्या या पैशांच्या खर्चावर शासन आतातरी अंकुश लावेल का? जाहिरातबाज सरकार फक्त जाहिरातबाजी न करता प्रसिद्धीचा हव्यास सोडून खरोखरच राज्याच्या विकासासाठी काम करेल का हा प्रश्न आहे, असं देखील नितीन यादव यांनी म्हटलं आहे.

www.surajyadigital.com | सोमवार, दि.६ फेब्रुवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १३१ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

घटस्फोटाचा राग डोक्यात बसला, सासऱ्याने जावयाचा काटा काढला

- हवालदाराने डोक्यात लोखंडी रॉडचे घाव घालून केला खून
- आठ जणांवर गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

घटस्फोटाचे कारण आणि पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याचा राग मनात धरून हवालदार असलेल्या सासऱ्यासह आठ जणांनी मिळून जावयाच्या डोक्यात लोखंडी रॉड आणि काठीने हल्ला करून निर्दयीपणे खून केला. ही घटना शनिवारी रात्री साडेदहा वाजता हुच्चेश्वर नगर भाग-३ याठिकाणी घडली. नितीन अनिल पतंगराव (वय-२७,रा.हुचेश्वर नगर, सोलापूर) असे खून झालेल्या जावयाचे नाव आहे. या प्रकारामुळे सोलापुरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी शहर पोलिसात हवालदार असलेल्या सासऱ्यासह आठ जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यापैकी तिघांना अटक करण्यात आली. अटकेतील आरोपींना तीन दिवस पोलीस ठेवण्याचा आदेश न्यायालयाने रविवारी दिला.

मयत नितीन पतंगराव

याबाबत मयत नितीनचा भाऊ सचिन अनिल पतंगराव (वय-२५, रा.हुच्चेश्वर नगर भाग-१, कुमठा नाका,सोलापूर) याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या फिर्यादीवरून हवालदार सासरा महेश शिवाजी शेजेराव (वय-५२, नियुक्ती शहर मुख्यालय) त्याचा मुलगा हर्षवर्धन शेजेराव वय १८ दोघे रा.वैष्णवी प्लाझा,जुळे सोलापूर आणि श्रीकांत गुरूलिंग कोळी (वय-३२, रा.जुळे सोलापूर) यांच्यासह आठ जणाविरूद्ध गुन्हा दाखल झाला. यापैकी तिघांना अटक करून पोलीस कोठडी घेण्यात आली.

महेश शेजेराव यांच्या मुलीचा विवाह नितीन पतंगराव याच्याशी झाला होता. त्यांच्यातील घटस्फोटाच्या कारणावरुन उभयतांमध्ये वाद होता. नितीन याचा मित्र प्रदीप पाटील याला माझ्या जावयासोबत का फिरतो, असे म्हणून मारहाण केली होती. या संदर्भात पाटील याने विजापूर नाका पोलिसात शेजेराव याच्याविरूद्ध काही महिन्यांपूर्वी तक्रार दिली होती.

हा राग मनात धरून वरील आरोपींनी आपला भाऊ नितीन पतंगराव याच्या डोक्यात लोखंडी रॉड व काठीने तसेच लाथा बुक्क्यांनी मारून जीवे ठार मारले आहे, अशा आशयाची फिर्याद मयताचे बंधू सचिन पतंगराव यांनी एमआयडीसी पोलिसात दाखल केली. या प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक माने हे करीत आहेत.

तिघांना अटक ; पोलीस कोठडी

एमआयडीसी पोलिसांना ही घटना कळताच महेश शेजेराव, त्याचा मुलगा हर्षवर्धन शेजेराव आणि श्रीकांत कोळी या तिघांना अटक करून पोलीस कोठडी घेतली. नितीनला मारहाण करताना आणखीन किती जणांचा सहभाग आहे, याचा तपास सुरू असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजन माने यांनी 'सुराज्य'शी बोलताना दिली.

सासऱ्यासह तिघांना अटक तीन दिवसांची पोलीस कोठडी

घटस्फोटाबाबत २३ तारखेला होणार होता निर्णय

नितीन याने पत्नी बरोबरच्या घटस्फोटाबद्दल वर्षापूर्वी अर्ज दिला होता. कोर्टात तारखा चालू होत्या. दोन दिवसांपूर्वी पावणे दोन लाख रुपये भरपाई भरली होती. येत्या २३ तारखेला यावर अंतिम निर्णय होणार होता. सासरे आणि मेहुणे वारंवार खलास करण्याची भाषा करत असल्याचे नितीन याने वडील आणि वकिलांना सांगितले होते. दोघांनी सबुरीचा सल्ला दिला होता. अशी आठवण वडिलांनी सांगितली.

काका मला वाचवा.. नितीनचा 'टाहो'

कामावरून घरी येत असताना घराजवळ अंधाराचा फायदा घेत आरोपींनी नितीन यास मोटरसायकल वरून खाली पाडून त्याच्यावर प्राणघातक हल्ला केला. रक्तबंबाळ अवस्थेत नितीन याने आपल्या बीबीदारफळच्या काकाला मोबाईलवरून संपर्क साधला.आणि काका मला वाचवा. मला शेजेराव व त्याच्या लोकांनी मारहाण केली आहे. माझा जीव जात आहे. मी थोडा वेळ जगणार आहे लवकर या,अशी विनवणी केली होती.

अधिकारी होण्याचे स्वप्न भंगले

नितीन हा रिलायन्स स्मार्ट पॉईंट या ठिकाणी कामास होता.मंगळवेढेकर इन्स्टिट्यूटमध्ये तो एमबीएचे शिक्षण घेत होता. शिकून तो काम करत होता.त्याचे अधिकारी होण्याचे स्वप्न होते.याचा आम्हाला अभिमान होता.त्याच्या मृत्यूमुळे हे स्वप्न भंगले, असे म्हणत त्याच्या वडिलांनी हंबरडा फोडला.

रिलायन्स स्मार्ट पॉईंट या ठिकाणी कामास होता

जुळे सोलापुरातील म्हेत्रे टॉवरच्या रिलायन्स स्मार्ट पॉईंट या ठिकाणी नितीन पतंगराव व त्याचा मित्र प्रदीप पाटील हे दोघे एकाच ठिकाणी मालाचे डिलेव्हरी करत होते.जावया सोबत का फिरतो म्हणत जुळे सोलापुरात शेजेराव या हवालदाराने प्रदीपला दि.२ नोव्हेंबर २०२२ रोजी मारहाण केली होती तसेच तू जर तक्रार देण्यासाठी पोलिसात गेलास तर तुला जीव मारतो, अशी धमकी देखील त्याने दिली होती.

कामावरून घरी येत असताना गाठले

मयत नितीन हा शनिवारी रात्री कामावरून दुचाकीवर घरी येत होता. त्याचे सासरे महेश शेजेराव याच्यासह आठ जणांनी त्याला हुच्चेश्वर नगर भाग तीनमधील एका रस्त्यावर गाठले. तिथेच या सर्वांनी लोखंडी रॉड व काठीने त्याला मारहाण केली. रॉडचे जबर घाव डोक्यात बसल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्याला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यानंतर जमखीला मध्यरात्री खासगी रुग्णालयात हलविण्यात आले.दरम्यान नितीन पतंगराव हा मयत झाला.

कामावरून घरी येत असताना गाठले

मयत नितीन हा शनिवारी रात्री कामावरून दुचाकीवर घरी येत होता. त्याचे सासरे महेश शेजेराव याच्यासह आठ जणांनी त्याला हुच्चेश्वर नगर भाग तीनमधील एका रस्त्यावर गाठले. तिथेच या सर्वांनी लोखंडी रॉड व काठीने त्याला मारहाण केली. रॉडचे जबर घाव डोक्यात बसल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्याच्या सर्वांगास जखमा होत्या. त्याला गंभीर अवस्थेत शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यानंतर जमखीला मध्यरात्री खासगी रुग्णालयात हलविण्यात आले.दरम्यान नितीन पतंगराव हा मयत झाला.

दलित कुटुंबाला १० लाख रुपये देणार : केसीआर

नांदेड : तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव (केसीआर) यांची महाराष्ट्रात मोर्चेबांधणी सुरू असून त्यांनी आज नांदेडमध्ये जाहीर सभा घेतली. यावेळी त्यांनी मोठी घोषणा केली असून देशात बीआरएसचं सरकार आल्यास प्रत्येक दलित कुटुंबाला दरवर्षी १० लाख रुपये दिल्या जाईल, असं ते म्हणाले. दरम्यान, यावेळी बोलताना त्यांनी शेतकरी आत्महत्यावरून राज्य तसेच केंद्र सरकार जोरदार टीकाही केली. देशात आज परिवर्तनाची आवश्यता आहे. देशाला आज स्वातंत्र्य होऊन ७५ वर्ष झाली आहेत. यादरम्यान देशात अनेकदा सरकारे बदलली. अनेक नेते, आमदार खासदार बदलले. अनेकांनी मोठी आश्वासने दिली. मात्र, आज देशात पिण्यासाठी पाणी नाही, शेतकऱ्यांकडे सिंचनासाठी पाणी नाही, गरिबांना आज वीजदेखील मिळत नाही. त्यामुळे या गोष्टी आपण समजून घेऊन एकत्र लढा दिला पाहिजे, अशी प्रतिक्रिया के.चंद्रशेखर राव यांनी दिली.

आज ४२ टक्के शेतकरी आपल्या देशात आहेत. त्यात आणखी शेतमजुरांची संख्या जोडली, तर ही आकडेवारी ५० टक्क्यांच्यावर जाते.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता तुला कोणी गांभीर्याने घेत नाहीत!!!

विधानसभेसाठी परिचारकांची अर्बन बँकेतून माघार?

सुराज्य/सूरज सरवदे

नुकत्याच झालेल्या पंढरपुर अर्बन बँकेच्या निवडणुकीतून माजी अध्यक्ष प्रशांत परिचारक यांनी मायार घेतली. परिचारक यांनी २० वर्षे अर्बन बँकेत संचालक आणि अध्यक्ष म्हणून काम पाहिले. युवकांना संधी देण्यासाठी परिचारक यांनी माघार घेतल्याचे सांगितले. मात्र बँकेच्या निवडणुकीतून माघार घेण्याचे हेच कारण आहे का? की विधानसभेच्या तयारीसाठी जबाबदाऱ्या कमी करण्यास सुरुवात केली आहे, याची चर्चा पंढरपुरात सुरू आहे.

सोलापूर जिल्ह्यात सहकारी संस्था काटेकोरपणे चालवण्यात परिचारक कुटुंबाचे नाव प्राधान्याने घेतले जाते. जिल्हा बँक, दूध संघ, पांडुरंग साखर कारखाना, अर्बन बँक, बाजार समितीवर परिचारकांचे वर्चस्व होते. तोट्यात गेलेल्या संस्था त्यांनी फायद्यात आणल्या होत्या. त्याला अपवाद युटोपियन साखर कारखाना ठरला आहे. कारखान्याच्या दिवाळीखोरीचा विषय सध्या राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधीकरणाकडे प्रलंबित आहे.

बँका, साखर कारखाना, दूध संघाची जबाबदारी असल्यामुळे प्रशांत परिचारक यांना जनतेसाठी जास्त वेळ देता येत नव्हते. २०१४ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये संस्थांचे मोठे जाळे असून सुद्धा पराभवाला सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे दूध संघानंतर बँकेच्या जबाबदारीतून मुक्त झाले आहेत. येणाऱ्या कार्यकाळात कार्यकर्त्यांसाठी वेळ देता येईल, संघटन वाढण्यास मदत होईल, असे बोलले जात आहे.

आमदार समाधान आवताडे यांच्या सोबत यांचे संबंध पहिल्यासारखे राहिले नाहीत. परिचारक - आवताडे यांच्यामध्ये दुरावा निर्माण झाला आहे. २००९ मध्ये मोहिते पाटील यांच्या प्रचार केला, २०१४, २०१९ ला पराभव स्वीकारावा लागला. २०२१ला आवताडे यांचा प्रचार करावा लागला. त्यामुळे प्रत्येकवेळी दुसऱ्यासाठी प्रचार करायचा? असे किती दिवस करणार असा प्रश्न कार्यकर्ते विचार आहेत. प्रशांत परिचारक यांनी २०२४ च्या विधानसभेसाठी उभे राहावे, अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे. आमदार आवताडे यांच्यापासून फारकत घेतल्यानंतर येणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी प्रशांत परिचारक रिंगणात उतरणार असा कयास लावला जात आहे. प्रशांत परिचारक यांनी निवडणुकीच्या दृष्टिकोनातून जुळवाजुळव सुरू केली आहे. त्याची प्रचिती मंगळवेढ्यात येताना दिसत आहे. तसेच जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी त्यांनी अर्बन बँकेतून माघार घेतल्याचे बोलले जात आहे. युटोपियन साखर करण्याला वाचण्यासाठी जिल्हा बँक महत्वाची ठरणार आहे.

शेतातील रस्ता बंद केला म्हणून डोक्यात सत्तूर घातला, एक जण गंभीर जखमी

सुराज्य/मोहोळ

स्वतःच्या शेतातून जाणारा रस्ता बंद का केला अशी विचारणा केल्याने सत्तूर चा घाव घालून एकास गंभीर जखमी केल्याची घटना मुंढेवाडी ता मोहोळ येथे शनिवारी दि. ४ फेबुवारी रोजी घडली.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहीती नुसार विकास कालीदास ढेरे यांनी दिलेल्या फिर्यादी नुसार त्यांच्या शेताच्या शेजारी सुरेश बलवंत लोखंडे यांची शेती आहे. फिर्यादीच्या शेतातून मुंडेवाडी बंधारा ते राम हिंगणी गावाला जाणार रस्ता आहे . तो रस्ता सुरेश लोखंडे यांनी बंद केला आहे .त्यांनी तो रस्ता बंद केल्यामुळे फिर्यादीने त्यांच्या शेतातून जाण्यास हरकत घेतली आहे. याबाबत त्यांच्यामध्ये वाद सुरू आहे. शनिवारी दि.४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास जेसीबीने काम संपवून फिर्यादी विकास ढेरे जेवण करण्यासाठी घरी जात होते. यावेळेस सुरेश लोखंडे यांच्या मुलास बोलावून तुम्ही मला रस्ता दिला नाही तर मी तुम्हाला माझ्या शेतातून जावू देणार नाही तु तुझ्या वडीलांना बोलावून घे म्हणून मुलास सांगीतले.

नंतर काही वेळाने जेसीबी जवळ विकास ढेरे आले असता पाठीमागून येवून सुरेश लोखंडे यांनी कोयत्याने ढेरे यांच्या डोक्यावर घाव घालून त्यांना गंभीर जखमी केले व लोखंडे याच्या दोन्ही मुलांनी फिर्यादीला लाथांबुक्क्याने मारहाण करून गळ्यातील पावणेतीन तोळ्याची सोन्याची चैन काढून घेतली व जिवंत सोडणार नाही अशी दमदाटी केली. दरम्यान फिर्यादीच्या डोक्यातून रक्त आल्यामुळे जवळपासच्या शेतकऱ्यांनी सोडवा सोडवी केली. फिर्यादी गंभीर जखमी झाल्यामुळे उपचारासाठी सोलापूरला पाठवण्यात आले आहे आणि आरोपी सुरेश बसंत लोखंडे व त्याचे दोन मुले यांच्यावर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस उपनिरीक्षक पंडित चव्हाण पुढील तपास करत आहे. मात्र आरोपीला अद्याप अटक झालेला नाही.

७१ खासदार झाले 'मालदार'

सुराज्य/सोलापूर

सत्तेतील मंत्री-संत्री,खासदार,आमदार यांचा डामडौर आणि ऐष पाहाता आता सर्वसामान्यांच्या तोंडालाही पाणी सुटत असते. गड्या आपणही एकदा ना एकदा खासदार,आमदार व्हायला पाहिजे,अशी भावना सामान्य माणसांच्या मनात तयार व्हायला लागते.कारण पायी चालणारा,सायकलवर फिरणारा एखादा कार्यकर्ता खासदार-आमदार झाल्यानंतर त्याची काय चैन असते? गाड्या,घोडे,बंगले...दिमतीला मागे-पुढे अधिकारी आणि पोलीस.काय हा रूबाब? का अभिलाषा वाढणार नाही? देशात तीन टर्म खासदारकी उपभोगणारे ७१ खासदार केवळ दहा वर्षात 'मालदार' झाल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली आहे.२००९ ते २०१९ या काळात त्यांच्या संपत्तीमध्ये सरासरी २८६ टक्के वाढ झाली आहे.ही संपत्ती 'कॉमन पिपल'ला चक्रावून टाकणारी आहे.

आपल्या देशात असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स ही एक संस्था आहे. सत्तेत असणारे लोकप्रतिनिधी यांची संपत्ती व त्यांच्यातील गुन्हेगारीकरण या बाबींचा ही संस्था शोध घेत असते.या संस्थेचा अहवाल प्रसिद्ध झाला असून त्यात ७१ खासदारांच्या संपत्तीविषयीची माहिती देण्यात आलीय. या रिपोर्टनुसार विजयपूरचे भाजप खासदार रमेश चंदप्पा जिगजिनगी यांच्या संपत्तीत सर्वाधिक वाढ झाली आहे. ज्या दहा खासदारांची संपत्ती सर्वाधिक वाढली त्यामध्ये भाजपच्या सहा खासदारांचा समावेश आहे. तर शिरोमणी अकाली दल, राष्ट्रवादी काँग्रेस, बीजू जनता दल आणि -एआययूडीएफच्या एका खासदाराचा समावेश आहे. अपक्ष खासदारांसह ७१ खासदारांची २००९ मध्ये सरासरी संपत्ती ६.१५ कोटी रुपये इतकी होती. २०१९ मध्ये यामध्ये २८६ टक्क्यांनी वाढ झाली असून त्यांची सरासरी संपत्ती १७.५९ कोटी झाली आहे. दरम्यान, मागील दहा वर्षात भाजपच्या खासदारांच्या संपत्तीमध्ये सरासरी ४२ पटीने वाढ झाल्याचेही या रिपोर्ट्समध्ये म्हटले आहे.

सर्वाधिक वाढ – जिगजिनगी यांच्याकडे २००९ मध्ये १.१८ कोटी रुपयांची संपत्ती होती. ती २०१४ मध्ये ८.९४ कोटी इतकी झाली तर २०१९ मध्ये ४२ पटीने वाढून ती ५०.४१ कोटी रुपये इतकी झाली. २००९ ते २०१९ या दरम्यान झालेल्या निवडणुकीवेळी खासदारांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या माहितीच्या आधारावर ही माहिती देण्यात आली आहे. २०१९ मध्ये सलग सहाव्यांदा खासदार झालेले जिगजिनगी हे २०१६ ते २०१९ यादरम्यान केंद्रीय राज्यमंत्री होते.

सुळेंच्या संपत्तीतही वाढ – या संस्थेच्या रिपोर्टनुसार, राष्ट्रवादी काँग्रेसच्या बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या संपत्तीमध्ये १७३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २००९ मध्ये त्यांची संपत्ती ५१.५३ कोटी इतकी होती. २०१९ मध्ये १७३ टक्क्यांनी वाढून १४०.८८ कोटी इतकी झाली. दहा वर्षात सुळे यांच्या संपत्तीमध्ये ८९.३५ कोटींची वाढ झाली दरम्यान, -एआययूडीएफचे खासदार बदरूद्दीन अजमल यांच्या संपत्तीमध्ये १६० टक्क्यांनी वाढ झाली. २००९ मध्ये त्यांची संपत्ती ३० कोटी होती तर २०१९ मध्ये त्यांची संपत्ती ७८ कोटी इतकी झाली. अकाली दलच्या खासदार हरसिमरत कौर बादल यांच्या संपत्तीत २६१ टक्क्यांनी वाढ झाल्याचे या अहवालामधून समोर आले आहे.

वरुण गांधींना ६० कोटींचा गल्ला – उत्तर प्रदेशमधून तिसऱ्यांदा खासदार झालेले भाजपचे नेते वरुण गांधी यांच्या संपत्तीमध्ये मोठी वाढ पाहायला मिळाली. २००९ मध्ये त्यांची संपत्ती ४.९२ कोटी होती. हीच संपत्ती वाढून २०१९ मध्ये ६०.३२ कोटी इतकी झाली. त्यांच्या संपत्तीमध्ये ११२४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २००९ मध्ये मेनका गांधी यांची संपत्ती १७ कोटी होती, जी २०१९ मध्ये ५५ कोटी इतकी झाली.

कोणत्या पक्षातील किती?– लागोपाठ तीन वेळा खासदार झालेल्या नेत्यांमध्ये भाजपच्या सर्वाधिक नेत्यांचा समावेश आहे. यामध्ये भाजपचे ४३ खासदार आहेत. दहा वर्षात भाजपच्या या खासदारांची संपत्ती सरासरी १५ कोटींनी वाढली आहे. २००९ मध्ये त्यांचे सरासरी

उत्पन्न चार कोटी होते... जे २०१९ मध्ये २० कोटी रुपये इतके झाले आहे. यामध्ये दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष काँग्रेस आहे. त्यांच्या दहा खासरारांची संपत्ती सरासरी १० कोटींनी वाढली आहे. २००९ मध्ये काँग्रेसच्या खासरांची सरासरी संपत्ती पाच कोटी होती.. जी २०१९ मध्ये १६ कोटी रुपये इतकी झाली. यामध्ये तृणमूल काँग्रेस या पक्षाचा तिसरा क्रमांक लागतो... ७१ पैकी तृणमूल काँग्रेसचे सात खासदार आहेत... २००९ मध्ये तृणमूल काँग्रेसच्या खासदारांची सरासरी संपत्ती ७६ लाख रुपये होती... जी २०१९ मध्ये ५.९ कोटी रुपये इतकी झाली आहे. शिवसेना आणि बीजद यांचे प्रत्येकी दोन दोन खासदार आहेत. तर एमआयएम, एआययूडीएफ व आययूएमएल जद(यू) आणि एनसीपी या पक्षाचे प्रत्येकी एका एका खासदारांचा समावेश आहे.

खलनायक गेला...

पाकिस्तानचे माजी लष्करप्रमुख परवेज मुशर्रफ यांनी जगाचा निरोप घेतला. केवळ पाकिस्तानच नव्हेतर भारतासाठी कर्दनकाळ ठरलेला खलनायक गेला, असे म्हणावे लागेल. माणसाने आपले जीवन जगताना आपल्या हातून काही चांगले कार्य होते का ते पहायला हवे. मुशर्रफ यांच्या हातून तसे काही चांगले घडलेलेच नाही.उलट रक्ताने त्यांचे हात माखलेले होते. कधी भारताशी संघर्ष तर कधी पाकिस्तानात आपल्या विरोधकांना संपवण्याचे कटकारस्थान.तेव्हा मुशर्रफ यांना सत्पुरुष म्हणायचे कसे? खलनायक आणि नालायकच म्हणावे लागेल. लोकांनी निवडून दिलेले सरकार पाडायचे कसे? आणि ती सत्ता हस्तगत कशी करायची? हे कपटकारस्थान मुशर्रफ यांच्या अंगी भिनलेले होते. २००१ ते २००८ या काळात पाकिस्तानचे राष्ट्रपती म्हणून त्यानंतर पाकिस्तानचे पंतप्रधान म्हणून त्यांनी काम पाहिले होते. २०१६ पासून ते दुबई येथे स्थायिक झाले होते. प्राणघातक हल्ले झाल्यानंतर जिवाच्या भीतीपोटी त्यांना पाकिस्तानातून पळ काढावा लागला. लष्करप्रमुख असताना व लोकशाही सरकारच्या पदांवर काम करताना भारताशी त्यांनी खुनशीपणा ठेवला. अतिरेकी संघटनांना पाठबळ देत जम्मू-काश्मीरवर डोळा ठेवला होता. लष्करप्रमुख असताना मुशर्रफ यांनी कारगिल युद्धाची आगळीक केली होती. भारतीय सैनिकांनी कारगिल युद्धात असीम शौर्य दाखवले होते. याच युद्धाला मुशर्रफ यांचे कट कारस्थान म्हणून ओळखले जाते. आपल्या राजकीय इच्छा पूर्ण करण्यासाठी मुशर्रफ यांनी कारगिलचे युद्ध छेडले होते. आपले आत्मचरित्र 'इन द लाइन ऑफ फायर' यामध्ये त्यांनी या युद्धाबाबत लिहिले की, 'पाकिस्तानी सैन्य युद्धात सहभागी होते, मात्र हे सत्य आम्ही लपवले.' या युद्धातील पराभवाचे खापर मुशर्रफ यांनी तत्कालीन पंतप्रधान नवाज शरीफ यांच्यावर फोडले होते. तत्कालीन पंतप्रधान नवाज शरीफ हे श्रीलंकेच्या दौऱ्यावर गेले असताना त्यांनी मुशर्रफ यांना लष्कर प्रमुख पदावरून हटविले होते. त्यांच्याजागी जनरल अजीज यांना लष्कर प्रमुख बनविण्यात आले. मात्र, जनरल अजीज हे परवेज मुशर्रफ यांचे विश्वासू सहकारी आहेत, याची नवाज शरीफ यांना कल्पना नव्हती. अखेर मुशर्रफ यांनी लष्कराच्या बळावर सत्ता काबीज करून शरीफ यांनाच सत्तेबाहेर काढत रस्ता दाखवला. मुशर्रफ यांची जन्मभूमी भारताची. फाळणीदरम्यान त्यांचे कुटुंब दिल्लीहून कराची येथे स्थायिक झाले. भारताच्या मातीशी इमान राखून त्यांना मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करता आले असते पण नाही. मुशर्रफ यांना भारताशी वैर घ्यायचे होते. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी बसने लाहोर दौरा करून मैत्रीचा हात पुढे केला होता परंतु, मुशर्रफ यांनी तो साफ धुडकावून लावला. तेही भारताच्या भेटीवर आले होते परंतु मनात कपट ठेवूनच. राजकारणात आपल्या वाटेच्या आड येणाऱ्यांना मुशर्रफ यांनी पद्धतशीरपणे संपवले होते. मुशर्रफ हेच माझी आई बेनझीर भुट्टोचे मारेकरी आहेत, असा आरोप पाकिस्तान पीपल्स पार्टीचे (पीपीपी) अध्यक्ष बिलावल भुट्टो यांनी केला होता. मुशर्रफ यांनी बेनझिर यांची सुरक्षा कमी करून टाकली होती. बेनझीर यांच्या हत्येप्रकरणी सुनावणी करताना कोर्टाने मुशर्रफ यांना फरार घोषित केले होते. दरम्यान, तहरिक-ए-तालिबान या पाकिस्तानच्या संघटनेच्या ५ कथित सदस्यांना पुराव्याअभावी सोडण्यात आले होते. बेनझीर यांच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आलेल्या दोन पोलीस अधिकाऱ्यांना १७ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली होती. त्याचबरोबर मुशर्रफ यांची संपत्ती जप्त करण्याचेही आदेश देण्यात आले होते. दुसरीकडे मुशर्रफ यांनी बेनझीर यांच्या हत्येमध्ये असामाजिक तत्त्वांचा हात असल्याचे पहिल्यांदाच मानले. जपानमधील 'मेनिची शिनबून' या वृत्तपत्राला मुशर्रफ यांनी मुलाखत देताना आपण भारतावर अण्वस्त्र हल्ल्याची तयारी केली होती असा गौप्यस्फोट केला होता. २००१ मध्ये भारताच्या संसदेवरील दहशतवादी हल्ल्यानंतर दोन्ही देशांमधील तणाव वाढला होता. २००२ मध्ये या तणावाने टोक गाठले होते. भारताविरोधात अण्वस्त्रांचा वापर करायचा की नाही, सीमेवर अण्वस्त्र न्यायचे का, असा प्रश्न मी रोज स्वतःला विचारायचो, या विचाराने मला रात्रभर झोपदेखील यायची नाही, असे मुशर्रफ यांनी म्हटले होते. भारताकडून अण्वस्त्रांचा वापर होण्याची शक्यता असल्याने मी अण्वस्त्रांचा वापर न करण्याचा निर्णय घेतला, असे मुशर्रफ यांनी सांगितले. या हुकूमशाहाला भारताची ताकत माहीत होती. म्हणूनच तो पुन्हा भारताच्या वाट्याला आला नाही. मुशर्रफनंतर कमर बाजवा हा लष्करप्रमुखही हुकूमशहाप्रमाणे वागला. इम्रान खान यांची सत्ता उलथवून टाकण्यात बाजवा याचाच हात होता. मुशर्रफ यांच्यासारख्या अनेक हुकूमशहांनी भारताशी वैर कायम ठेवल्याने पाक आज कंगाल होत चालला आहे. पाकचे तुकडे होण्याची वेळ आली. ही त्यांच्या पापाची फळे आहेत.

राजकीय

'भारत जोडो'चे फलित काय?

अखिल भारतीय काँग्रेसचे माजी अध्यक्ष खासदार राहुल गांधी यांची कन्याकुमारीपासून सुरू झालेली 'भारत जोडो' यात्रा काश्मीरमध्ये समाप्त झाली. गेल्या वर्षी ७ सप्टेंबर रोजी 'भारत जोडो यात्रा' सुरू झाली आणि ३० जानेवारीला श्रीनगर येथे विराम झाला. कन्याकुमारीपासून ते काश्मीरपर्यंत १४६ दिवस चाललेली राहुल यांची यात्रा ही जर राजकीय नव्हती, तर भाजपविरोधी २३ राजकीय पक्षांना त्यात सहभागी होण्यासाठी निमंत्रण कशासाठी दिले होते? 'भारत जोडो यात्रा' जर शांती व सद्भावना यासाठी होती, तर रोज भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, मोदी आणि शहा यांच्यावर टीका-टिप्पणी कशासाठी केली जात होती? 'भारत जोडो यात्रे'चा लाभ काँग्रेस पक्षाला किती मिळाला, हे येत्या ९ राज्यांतील विधानसभा निवडणुकीनंतर समजू शकेल. पण राहुल यांची प्रतिमा बदलण्यासाठी ही यात्रा होती, याची कबुली स्वत: राहुल यांनीच दिली आहे.

पूर्वीचे राहुल गांधी विसरा, असे ते सांगत होते. राहुल गांधी हे परिपक्व व गंभीर नेते आहेत, हे देशाला दाखविण्यासाठी 'भारत जोडो'चा खटाटोप होता. ते युवराज नाहीत, राजपुत्र नाहीत, घराणेशाहीतून आलेले नेते नाहीत आणि पप्पूही आता राहिलेले नाहीत, हे ठसविण्याचा भारत जोडोतून प्रयत्न होता. भाजप विरोधकांना एकत्र आणण्याचे त्यांनी 'भारत जोडो'च्या निमित्ताने प्रयत्न केले. पण निमंत्रित केलेल्या २३ पैकी ८ राजकीय पक्ष वगळता इतरांनी त्याकडे पाठ फिरविल्याचे बघायला मिळाले.

भारत जोडोला अभूतपूर्व प्रतिसाद मिळतोय, असे भासविण्यात येत होते. मग यात्रा अंतिम टप्प्यात असताना महाराष्ट्रात विधान परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तांबे पिता-पुत्रांवर कारवाई करण्याची का पाळी आली? ज्यांना पक्षातून निलंबनाची कारवाई केली, ते महाआघाडीचा दणदणीत पराभव करून विधान परिषद निवडणुकीत विजयी झाले, हेच भारत जोडोचे फलित म्हणायचे का? 'भारत जोडो यात्रा' चालू असतानाच महाराष्ट्रात काँग्रेसमध्ये बंडखोरी झाली. हे कशाचे लक्षण समजायचे?

'भारत जोडो यात्रा' महाराष्ट्रात आली असताना, स्वत: राहुल गांधींनी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांवर ब्रिटिशांची माफी मागितल्याचे आरोप करून स्वत:च्या यात्रेला स्वत:च गालबोट लावण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्या वक्तव्याने त्यांचा मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेची कोंडी झाली. राहुल यांच्या अपरिपक्वतेचे दर्शन यानिमित्ताने महाराष्ट्राला झाले. १९९० पर्यंत महाराष्ट्रात काँग्रेसने सत्ता उपभोगली. सातत्याने काँग्रेसने राज्याला सर्वाधिक मुख्यमंत्री दिले.

राज्याच्या सर्व २८८ मतदारसंघांत काँग्रेस पक्षाचा मतदार आहे. पण 'भारत जोडो यात्रे'चा लाभ मिळतोय, असे कुठे दिसले नाही. पक्षाचे नेते, कार्यकर्ते व मीडियाचे कॅमेरे हे राहुल गांधी यांच्या अवती-भोवतीच फिरताना दिसत होते. राज्यात काँग्रेस पक्ष गटातटात विभागला गेला आहे व गेल्या तीन निवडणुकांतून काँग्रेसच्या मतांची टक्केवारी सतत

घसरत आहे. २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसची मतांची टक्केवारी पाच टक्क्यांनी घसरली. विधानसभेत केवळ या पक्षाचे ४४ आमदार निवडून आले. काँग्रेसचे एवढे खराब प्रदर्शन यापूर्वी कधी झाले नव्हते. पक्ष संघटनेला बळ देईल, असा राज्यात काँग्रेसकडे नेता नाही, भारत जोडोनंतर पक्षात काहीच फरक पडलेला दिसला नाही. काँग्रेस हा महाविकास आघाडीचा प्रमुख घटक पक्ष आहे. ठाकरे सरकारच्या काळात सुरुवातीला विधानसभेचे अध्यक्षपद काँग्रेसकडे होते. पण मिळालेले हे महत्त्वाचे पदही काँग्रेसला राखता आले नाही. राहुल व त्यांच्या 'भारत जोडो'मुळे महाराष्ट्रातही पक्षाला शक्ती मिळाली, असे जाणवले नाही.

काश्मीरमधील श्रीनगर येथील शेर-ए-काश्मीर स्टेडियमवर भारत जोडोचा समारोप झाला. याप्रसंगी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी तेवीस राजकीय पक्षांना (भाजप विरोधक) निमंत्रण दिले होते. नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपी, डीएमके, सीपीआय, आरएसपी, आयूएमएल, बीएसपी, जेएमएम, व्हीकेसी हे आठ पक्ष हजर राहिले. मात्र तृणमूल काँग्रेस, जनता दल यू, शिवसेना, तेलुगू देशम, सपा, सीपीआय एम, राजद, आरएलएसपी, एचएएम, केरळ काँग्रेस, एमडीएमके, आरएलडी, जनता दल एस हे राजकीय पक्ष फिरकले नाहीत. सीपीआय एमचे सरचिटणीस सीताराम येच्युरी यांना निमंत्रण देऊनही ते भारत जोडोच्या समारोपाला गेले नाहीत. ओमर अब्दुल्ला व मेहबूबा मुफ्ती हे जम्मू-काश्मीरचे दोन माजी मुख्यमंत्री मात्र 'भारत जोडो' समारोपाला हजर होते. भाजपनंतर देशात काँग्रेस हा मोठा जनाधार असलेला राजकीय पक्ष आहे. गेल्या आठ वर्षांत भाजपने काँग्रेसला मतांच्या टक्केवारीत बरेच मागे टाकले आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला १०६ दशलक्ष मते मिळाली होती, तर २०१९ च्या निवडणुकीत ११९ दशलक्ष मते प्राप्त झाली होती. तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, आम आदमी पक्ष, वायएसआर काँग्रेस अशा प्रादेशिक पक्षांनी काँग्रेसची व्होट बँक मोठ्या प्रमाणावर आपल्याकडे खेचून घेतली.

'भारत जोडो' यात्रेनंतर अन्यत्र गेलेली मते काँग्रेसला परत मिळवता येतील का?, या प्रश्नाचे उत्तर आज तरी सकारात्मक देता येत नाही. २०२३ व २०२४ मध्ये होणाऱ्या निवडणुकींसाठी 'भारत जोडो यात्रा' काँग्रेसला नवजीवन देऊ शकेल का? या प्रश्नाचे उत्तरही ठामपणे देता येणार नाही.

भारत जोडोमुळे काँग्रेसची मतांची टक्केवारी वाढेल काय? हा कळीचा मुद्दा आहे. त्याचे उत्तर नऊ राज्यांतील विधानसभा निवडणुकांनंतरच देता येईल. नुकत्याच झालेल्या सी व्होटर्स सर्व्हे नुसार अरविंद केजरीवाल व ममता बॅनर्जी यांना विरोधी नेता म्हणून लोकांची अधिक पसंती आहे. राहुल गांधी यांचे नाव तेही विरोधी नेता म्हणून तिसऱ्या क्रमांकावर आहे. प्रादेशिक पक्षाच्या नेत्याला राहुल गांधींपेक्षा अधिक पसंती मिळते, हे काँग्रेसचे अपयश आहे. 'भारत जोडो' यात्रेतून हे अपयश राहुल यांना पुसून टाकता येईल का? 'भारत जोडो' यात्रेतून राहुल गांधी हेच काँग्रेसचे सर्वोच्च नेते आहेत, हे देशाला दिसून आले. मल्लिकार्जुन खर्गे हे निवडून आलेले पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असले तरी ते पक्षाचे सीईओ (मुख्य कार्यकारी अधिकारी) आहेत. काँग्रेस पक्षाचे हायकमांड गांधी परिवारच आहे, हाच संदेश 'भारत जोडो यात्रे'ने दिला आहे.

- सुकृत खांडेकर.

टुडेज् ब्लॉग

दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या लतादीदी

आपल्या मंजूळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांचा आज पहिला स्मृतिदिन. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दीदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दीदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव 'लतिका' असे होते. या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव 'लता' असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल? या चित्रपटातील 'नाचू या गडे खेळू सारे...' हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दीदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या 'महल' चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकारांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दीदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस. डी. बर्मन, सी. रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी. बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दीदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लतादीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले 'ये मेरे वतन के लोगो...' हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले अश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. 'आनंदघन' या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजूळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लतादीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हून अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करिना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार 'पद्मभूषण' देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार 'पद्मविभूषण'ने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले.

एम. एस. सुब्बलक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रान्स सरकारने 'ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर' या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लतादीदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअरकडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले.

१९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरुवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लतादीदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. मागील वर्षी ६ फेब्रुवारी रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. 'भारतरत्न' लता मंगेशकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे.

जन्म हा अखेरचा

भावाचारस्थल - १

भावाचारस्थलाबद्दल ज. रेणुकाचार्य पुढे सांगतात,

'भाववेत् सर्वकर्माणि नित्यनैमित्तिकानि च ।
शिवप्रीतिकराण्येव संगराहित्यसिध्दये ।।१६.७३।।

कर्म अनेक प्रकारचे असून त्याचे विहित कर्म आणि निषिध्द कर्म असे वर्गीकरण केले जाते. 'जे करा' असे शास्त्र सांगते ते विहित कर्म आणि 'जे करु नका' असे शास्त्र सांगते ते निषिध्द कर्म. काय करावे आणि काय करु नये हे माणसांना कळत नाही, म्हणून परमेश्वराने वेद-आगमांच्या द्वारा ते विवरुन सांगितले आहे. जे निषिध्द कर्म होय. इष्टलिंगपूजन, धर्मग्रंथाच्या स्वाध्याय ही वीरशैवांची नित्यकर्मे होत. याप्रमाणे अन्य धर्मीयांची नित्यकर्मे आहेत. काही निमित्ताने करावी लागणारी कर्मे 'नैमित्तिक कर्मे' होत. श्रावण महिन्यात, अधिक मासात अनुष्ठान, व्रते करणे, तीर्थयात्रा करणे इत्यादी नैमित्तिक कर्मे होत. अशी इतरही नैमित्तिक कर्मे आहेत. लौकिक आणि पारलौकिक सुखांच्या अपेक्षेने केले जाणारे कर्म हे 'काम्यकर्म' होय. स्वर्गप्राप्तीच्या इच्छेने कर्म करणे हे तर काम्यकर्म आहेच, परंतु तुम्ही ईश्वरला लौकिक सुखे मागण्यासाठी जे काही कर्म करता तेदेखील काम्यकर्मच होय. भगवंतालाही आपण लालूच दाखवतो. व्यवहारात लालूच दाखवण्याची जी सवय जडली तिचा परमार्थात देखील उपयोग करतो. ईश्वराला वाटते की ठीक आहे, लालूच दाखवायला आणि खूप काही मागायला तरी आपल्याकडे येतोय ना. **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

सुसंस्कृत पिढी घडविण्याचे केंद्र

भारतातील महाविद्यालयांतून शिक्षण येत असलेल्या युवक-युवतींना ग्रामीण परिसराची जाणीव व्हावी, त्यांची सामाजिक कार्यात रुची वाढावी, शर्मदानाचे महत्त्व समजावे, सांस्कृतिक आदान-प्रदान होत असताना गतिक्षम नेतृत्व निर्माण व्हावे, या उद्देशाने महात्मा गांधी जन्मशताब्दी वर्षाचे निमित्त साधून २४ सप्टेंबर १९६९ पासून राष्ट्रीय सेवा योजना स्थापण्यात आली. युवक हा राष्ट्रीय सेवा योजनेचा केंद्रबिंदू असून, युवाशक्ती ही राष्ट्रीय संपत्ती आहे. युवकांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजना करीत आहे. देशाला सर्वोच्च स्थानावर नेणारा सुसंस्कारित युवक घडला नाही, तर देशाची अधोगती झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे युवाशक्तीकडे राष्ट्रीय संसाधन म्हणून पाहण्याची गरज आहे. थोर समाजसेवक बाबा आमटे म्हणत, तरुणांचे हात उगारण्यासाठी नसून, देश उभारण्यासाठी आहेत. या तरुणांच्या शक्तीचा उपयोग ग्रामीण जनतेच्या विधायक कार्यासाठी करून घ्यायला हवा. युवकांमध्ये नैतिक व सामाजिक मूल्ये रुजवली पाहिजेत. वाढत्या आत्महत्या, पैशांची लालसा वाढत चालल्याने गरज

भागविण्यासाठी धुंडाळलेला वाममार्ग, वाढती व्यसनाधीनता, आदी समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालय पातळीवर व्हायला हवे. सुदृढ युवक हा सुदृढ समाजाची निर्मिती करू शकतो, हे लक्षात घेऊन या योजनेला सर्व स्तरांतून सहकार्य मिळण्याची अपेक्षा आहे. महाविद्यालयीन शिबिरे, विद्यापीठस्तरीय शिबिरे, मेगा कॅम्प शिबिरे, राज्यस्तरीय शिबिरे आदींच्या माध्यमांतून व्यक्तिमत्त्व विकास, राष्ट्रप्रेम, युवक नीतिमूल्ये, सामाजिक संस्कार, अंधश्रद्धा निर्मूलन, पर्यावरण संतुलन, वृक्षलागवड, मूल्यशिक्षण, साक्षरता यांसारख्या मूल्यांचा या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून प्रसार सुरू आहे. तरुण हाच खरा देशाचा आधारस्तंभ आहे.

- मच्छिंद्र ऐनापुरे, जत, जि. सांगली.

बिबट्या व्हिलन नाही, तर हिरो...

हल्ली नाशिक शहरात बिबट्याचा वावर नित्याचा झाला आहे. तसेच ग्रामीण भागातही बिबट्या दिसून येत असल्याने भीतीचे वातावरण असते. त्यामुळे हल्ले किंवा नागरिकांचे जखमी होणं, हे घडत आहे. अशावेळी माध्यमांनी योग्य भूमिका घेणं महत्वाचं आहे. आपल्या बातम्यांमधून 'बिबट्या' हा व्हिलन ठरु नये, जेणेकरुन जनसामान्यांमध्ये बिबट्याप्रति नकारात्मक भावना निर्माण होणार नाही.

नाशिक आणि बिबट्या हे जणू समीकरण झालं आहे. त्यामुळे बिबट्या मानवी परिसरात आढळून येणं काही नवीन नाही. नाशिक शहर आणि लगतचा परिसर हा शेतीयुक्त असल्याने ऊस, गहू, द्राक्ष तसेच मोठ्या प्रमाणावर जंगल परिसर असल्याने बिबट्याचा संचार दिसून येतो. अनेकदा शेतात बांधलेल्या बकऱ्या, कोंबड्या, गुरे जनावरे यांच्यावर बिबट्याकडून हल्ला करण्यात येतो. अनेक वेळा नागरिकांवर हल्ल्याच्या घटना समोर आल्या आहेत. यामध्ये बातम्या करताना शीर्षक किंवा मथळा भडक असू नये. फोटो छापताना आक्रमक नसावा, यासारखी काळजी घेतली पाहिजे.

'बिबट्यासोबत माध्यमांचे सहजीवन' या विषयावर परिसंवाद

नाशिकमध्ये नाशिक पश्चिम वनविभाग आणि वाईल्डलाईफ कॉन्झर्वेशन सोसायटी यांनी बिबट्यासोबत माध्यमांचे सहजीवन यावर परिसंवादाचे आयोजन केले होते. यावेळी पत्रकार अक्षय मांडवकर यांनी संवाद साधला. याद्वारे बिबट्या आणि मानव यातील द्वंद्व उलगडण्यात आले. माणसे टाळण्यासाठी बिबटे खूपच प्रयत्नशील असतात. त्यांची समस्या ही आहे की ते अत्यंत संयोजनक्षम प्राणी आहेत आणि ते माणसांच्या अगदी जवळ राहू शकतात. हल्ली नाशिक शहरात कुठेही बिबट्या आढळून आला की, पत्रकारांची फौज तयारच असते. बिबट्या एखाद्या झाडावर अगदी शांतपणे जरी बसलेला दिसला तरी लगेच माध्यमांची फोनाफोनी सुरु होतो. सर्वच पत्रकार त्याठिकाणी उड्या घेतात, त्याचबरोबर स्थानिक नागरिकांची बिबट्या असलेल्या ठिकाणी झुंड तयार होते. ही झुंड नंतर नियंत्रणात आणता येत नाही आणि जास्तीत जास्त वेळेस बिबट्या यातून पळून जाण्याचा प्रयत्न करतो. असे करताना त्याच्याकडून काही लोकांना इजा होते आणि मग त्यांना जणू त्या बिबट्याला

मारायचा अधिकारच मिळतो आणि हा सगळा प्रकार आक्रमकरित्या कॅमेऱ्यात किंवा कागदावर उतरवला जातो.

विशेष म्हणजे अशाप्रकारचे आक्रमक आणि भीषणता दाखवणारे वार्तांकन हे फक्त बिबट्यांचेच नव्हे तर नागरिकांसाठी मोठे नुकसान करु शकते. जास्तीत जास्त भीती निर्माण केली गेली की लोकांकडून त्यांना आपल्या परिसरातून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी जोर धरु लागते. वन विभाग परिसरात पिंजरा लावून बिबट्याला पकडून जवळच्या जंगलात सोडून देते. परंतु बिबट्याच्या मूळप्रकृतीमुळे ही समस्या आणखीच बिघडते. बिबट्या हा एक अत्यंत स्थाननिष्ठ प्राणी आहे. प्रौढ बिबटे आपले घर सोडत नाहीत. आता जर अशा एखाद्या प्राण्याला पकडून ४०० किलोमीटर दूरही नेऊन सोडले तरी तो परत आपल्या घरी येण्याचा प्रयत्न करतो, असे दिसून आले आहे.

अतिरंजित आणि भडक, तथ्यहीन वार्तांकन टाळावं

अशावेळी इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रित माध्यमांनी बिबट्याबद्दलच्या घटना कव्हर करताना अतिरंजित आणि भडक तथ्यहीन वार्तांकन टाळावे. बिबट्याचे हल्ले हे कशामुळे होत आहेत, याचा बारकाईने अभ्यास करत वनाधिकाऱ्यांशी चर्चा करावी. प्रत्यक्षरित्या फिल्डवर हजर राहून वार्तांकन करण्यावर भर द्यावा. कारण फिल्डवरील परिस्थिती वेगळी असते. बिबट्याने नागरिकांच्या वसाहतीत प्रवेश केल्यानंतर वार्तांकनासाठी सैरभैर होणे टाळावे. इलेक्ट्रॉनिक चॅनलमधून वारंवार बिबट्याचा आक्रमक चेहरा असलेले फोटो, व्हिडीओ दाखवले जातात, ते टाळायला हवे. शहरी भागातील बिबट्या आणि त्याचा सुरु असलेला संघर्ष दुर्लक्षित करुन माध्यमांनी एकतर्फी वार्तांकन टाळायला हवे, जेणेकरुन बिबट्या जनसामान्यांमध्ये व्हिलन ठरणार नाही. माध्यमांमधून प्रसारित होणाऱ्या बातम्यांमुळे सामान्य जनतेची मानसिकता तयार होत असते, यामुळे बिबट्याबाबतचे वार्तांकन समतोल साधणारे हवे. ज्या भागात बिबट्या दिसला किंवा आला तेथे दुसऱ्या दिवशी वन्यजीवप्रेमी आणि वनकर्मचाऱ्यांनी जाऊन नागरिकांच्या भेटी घेऊन संवाद साधायला हवा. लोकाभिमुख वार्तांकन करत बिबट्यालाही न्याय द्यावा, कारण वन्यजीव जैवविविधता आणि अन्नसाखळीतील महत्त्वाचा वन्यप्राणी असून भारतीय वन्यजीव संरक्षण कायद्यात शेड्यूल-१ मध्ये त्याला संरक्षण दिलेले आहे. वाघाइतकेच संरक्षण कायद्याने बिबट्याला दिलेले आहे. यामुळे बिबट्याबाबत संवेदनशील वार्तांकन गरजेचे आहे.

- गोकुळ पवार.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

आय स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

सोलापूर : मुरारजी पेठ परिसरातील आय - स्कूलचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. शनिवारी सायंकाळी अरविंद धाम परिसरातील मनोहर सांस्कृतिक भवन येथे झालेल्या कार्यक्रमास प्रमूख पाहुणे म्हणून उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील सहायक मोटार वाहन निरीक्षक प्रियंका माने, योगा शिक्षक प्रा. सपना जाधव उपस्थित होत्या. शाळेच्या प्रमूख श्वेता मेगेरी यांनी स्वागत केले. यावेळी प्ले ग्रुप, नर्सरी तसेच एलकेजीच्या विद्यार्थ्यानी उत्कृष्ट नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्याना पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी बालकांबरोबर मॉम विथ चाईल्ड हा आगळा-वेगळा कार्यक्रम देखील लक्षणीय ठरला. या कार्यक्रमामध्ये बालकाबरोबर मातांनीही सहभाग येत बालकांचा उत्साह वाढवला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व बालकांनी एकत्र येत झिंगाट गाण्यावर नृत्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती बाबर यांनी केले. यावेळी शिक्षिका सुवर्णा जाधव, आरती कसबे उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी जितेश मेगेरी, अंगद माने, योगेश माने, ओंकार माने, आशिष वांगी आदीनी सहकार्य केले. चिमुकल्यांची कला पाहण्यासाठी पालकांची यावेळी मोठी उपस्थिती होती.



माळशिरस येथे रिपब्लिकन पक्षाची बैठक

वेळापूर : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुका कार्यकारिणीची बैठक रिपाइं आठवले माळशिरस तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या अध्यक्षतेखाली माळशिरस येथील शासकीय विश्रामगृह या ठिकाणी बैठक संपन्न झाली.या बैठकीस,पश्चिम महाराष्ट्र नेते दयानंद धाईंजे, तुकाराम बाबर, जिल्हा युवक कार्याध्यक्ष किरण धाईंजे, जिल्हा उपाध्यक्ष नितिन मोरे, तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, तालुका कार्याध्यक्ष समाधान भोसले, धीरज मोरे ,रमेश धाईंजे, एस एम गायकवाड, कोषाध्यक्ष समीर सोरटे, भास्कर बनसोडे, राम कांबळे, अकलूज शहराध्यक्ष अजित मोरे, युवक सरचिटणीस प्रवीण साळवे, संजय भोसले, मारुती शिंदे, शेखर सावंत, प्रकाश गायकवाड, संतोष कांबळे, शिवाजी ठोकळे, राजरत्न नाईकनवरे, बापूसाहेब पोळके, अण्णासाहेब गेजगे उपस्थित होते. बैठकीमध्ये गाव तेथे नवीन शाखा निर्माण करणे,शाखा नूतनीकरण करणे,नव्याने क्रियाशील सभासद करणे,आगामी जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणूक बद्दल चर्चा करणे,विविध विषयांना घेऊन माळशिरस तहसीलवर आंदोलन करण्यात यावे आदी विषयावरती तालुका कार्यकारणीची बैठक आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी राजेंद्र जाधव, शरद साबळे, दिलिप भोसले, विश्वजीत भालशंकर, राजू सुरवसे, स्वप्निल सरवदे, पंकज भोसले, अजितदादा साठे, राम बनसोडे, राजाभाऊ भोसले, आप्पा सावंत, किरण भोसले, गणेश सावंत, रमेश भोसले इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रस्ताविक समीर सोरटे यांनी केले तर आभार समाधान भोसले यांनी मानले.

कृषी सहसंचालकांची सोलंकरवाडी गावास भेट

मोडनिंब : एकाच वेळी चाळीस शेतळी खोदणारे सोलंकरवाडी हे महाराष्ट्रातील एकमेव गाव असुन पुढे हे शेततळ्याचे गाव म्हणून ओळखले जाईल असे विचार कृषी सहसंचालक रफिक नायकवडी यांनी मांडले. शेतळे म्हणजे शेतकऱ्यांचे एटीएम आहे. गरज पडेल तेव्हाच पाणी उपसावे व पिकाला द्यावे अन्यथा ते शिल्लक ठेवावे. ती शेतकऱ्यांची संपत्ती आहे. कृषी विभाग व सोलंकरवाडी ग्रामस्थ यांचा सहसंबंध अतुट राहील.येथील ग्रामस्थ मनापासून शेतीवर प्रेम करतात असेही ते म्हणाले. आज त्यांनी माढा तालुक्यातील सोलंकरवाडी गावास भेट देऊन विविध कामांचा आढावा घेतला. बैलगाडीतून यावेळी शेताशेतातुन शिवारफेरी काढण्यात आली, शेती व पिके त्यांना दाखवली.यावेळी त्यांच्या शुभहस्ते मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेच्या शेततळ्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजाभाऊ भांगिरे यांनी केले.यावेळी गावातील भीमराव मोरे, संभाजी पाटील तसेच कृषी विभागातील संजय पाटील, दादासाहेब पवार यांचा सत्कार करण्यात आला यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सोलापूरचे बाळासाहेब शिंदे तसेच सिताराम जी कोलते, वैभव तांबे,उपविभागीय कृषी अधिकारी कुर्डूवाडीचे रवींद्रजी कांबळे, तालुका कृषी अधिकारी बार्शीचे शहाजी कदम, तालुका कृषी अधिकारी माढाचे भारत कदम, गऊ ऑफिसचे माने, सरपंच अनंता गलांडे, उपसरपंच माणिक शेंडगे, प्रगतशील शेतकरी राजाभाऊ भांगिरे, बाबासाहेब पांढरे, भीमराव मोरे, विठ्ठल झाडकर,दिगंबर खरात,बबन शेंडगे, अनिल शेंडगे, जय हनुमान कृषी विकास गटाचे अध्यक्ष गणेश माळी, बाळासाहेब भांगिरे, संतोष गलांडे,शिवाजी गलांडे, दत्ता गाडे, संभाजी पाटील, आण्णा भांगिरे, अर्जुन भांगिरे, दिनकर मोरे, शिवाजी शिंदे, बाळराजे पाटील,रोकडे गुरुजी,परमेश्र सुरवसे,दत्ता मोरे, उमेश मोरे, बाबासाहेब शेंडगे, गोपाळ माळी, निखिल मोरे, बळी शेंडगे, हनुमंत गलांडे, संजय मोरे, संदिप गलांडे, सोमनाथ शेंडगे, हनुमंत भांगिरे इत्यादी शेतकरी उपस्थित होते.

राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्तावाचे आवाहन

माढा : शिंदेवाडी तालुका माढा येथील शासनमान्य राहुल सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आमदार श्री बबनराव शिंदे राज्यस्तरीय प्रेरणा पुरस्कार २०२३ साठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन ग्रथालयाचे अध्यक्ष कांतीलाल साळुंके यानी केले आहे.

२६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता शिंदेवाडी येथे आमदार बबनराव शिंदे व आमदार संजयमामा शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे. ग्रंथपाल. ग्रंथालय कार्यकर्ता. पत्रकार. खेळाडू. सामाजिक कार्यकर्ता. साहित्यिक. कवी या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या व्यक्तींचा यामध्ये समावेश असून पुरस्कार सोहळ्याचे हे पाचवे वर्षे आहे. संबधित व्यक्तींनी दोन फोटो व बायो डेटा रजिस्टर पोस्टाने आपले प्रस्ताव दिनांक १५ फेब्रुवारी पर्यंत पाठवणे आवश्यक असून पुरस्काराचे स्वरूप मानचिन्ह प्रमाणपत्र शाल ग्रंथभेट असे आहे . कांतीलाल साळुंके, अध्यक्ष, राहुल सार्वजनिक वाचनालय शिंदेवाडी ता माढा फोन नं ९८८१%०८३१५ या पत्त्यावर पाठवण्याचे आवाहन आयोजन समितीचे अध्यक्ष उपसरपंच संजय सावंत यांनी केले आहे.

आ. देशमुख-वालेंनी केला दौरा अजमेरचा; राजकीय वर्तुळात ठरला विषय चर्चेचा

सुराज्य/सोलापूर

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ आ. विजयकुमार देशमुख यांनी नुकताच अजमेर शरीफ दौरा केला. या अजमेर दौऱ्यात महेश बँकेचे व्हाईस चेअरमन मल्लिनाथ मसरे, सिध्देश्वर यात्रेचे मानकरी राजशेखर हिरेहब्बु, बाळासाहेब मुस्तारे, यांच्यासह एक चेहरा लक्ष वेधून घेत आहे तो म्हणजे काँग्रेस पक्षाचे माजी शहराध्यक्ष तथा विद्यमान सिध्देश्वर बँकेचे चेअरमन प्रकाश वाले यांचा. एकमेकांचे कट्टर विरोधक असलेले आमदार विजयकुमार देशमुख आणि प्रकाश वाले यांची ही ट्रीप शहर परिसरात चर्चेचा विषय बनला आहे.

वाले हे शहराध्यक्ष पदावरून गेल्यापासून त्यांचा काँग्रेस पक्षात सक्रिय सहभाग दिसत नाही. शहर उत्तरचे आ. विजयकुमार देशमुख यांचे ते कट्टर विरोधक समजले जात होते. गत वेळीची लोकसभा असो किंवा विधानसभा निवडणूक असो वाले यांनी विजयकुमार देशमुख यांच्यावर जोरदार टीका केली होती. मात्र या आता दोघांच्या एकत्रित अजमेर शरीफ दौऱ्याने आता चर्चेला उधाण आले आहे.

सिध्देश्वर कारखान्याच्या प्रश्नावर निघालेल्या मोर्चा नंतर झालेल्या जाहीर सभेत एकप्रकारे नाव न घेता सर्वपक्षीय नेते विजयकुमार यांच्या विरोधात काडादी यांच्या बाजूने होते. त्यामुळे देशमुख यांना अडचण निर्माण झाली आहे. या मोर्चानंतर धर्मराज काडादी यांनी विजयकुमार देशमुख यांना थेट आव्हान दिल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला तोंड फुटले होते. उत्तर मधून आता देशमुख विरोधात काडादी अशी लढत होईल अशी चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने काडादी यांना ताकद देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले. दुसरीकडे शहर उत्तर मधून महेश कोठे यांनीही जोरदार मोर्चे बांधणी सुरू केली आह. विजयकुमार देशमुख यांना चारही बाजूंनी घेण्याचा प्रयत्न विरोधकांनी सुरू केला आहे. महापालिका निवडणूक कधीही लागण्याची शक्यता आहे ही महापालिका निवडणूक म्हणजे आगामी विधानसभेचे रंगीत तालीमच ठरणार आहे या निवडणुकीत विजयकुमार देशमुख यांनीगेल्या प्रमाणे जर कामगिरी केली तर त्यांना शहर उत्तरची विधानसभा निवडणूक त्यांना सोपी जाणार आहे त्यामुळे आता हळूहळू विजयकुमार देशमुख यांनीही आपले पत्ते ओपन करण्यास सुरुवात केली आहे. शहर उत्तर मधील लिंगायत समाजांच्या नेत्यांना देशमुख यांनी पुन्हा जोडण्यास सुरुवात केल्याचे पहायला मिळते.

लग्नकार्यात भेट झाली बाकी काही विषय नाही : वाले

जवळच्या मित्राच्या मुलीच्या लग्नासाठी आपण अजमेरला गेलो होतो. त्या लग्नाला आमदार विजयकुमार देशमुख यांनाही आमंत्रण होते. त्या लग्नात आमची भेट झाली बाकी त्या कोणतीही चर्चा आणि विषय झालेला नाही, असे प्रकाश वाले यांनी दैनिक सुराज्यशी बोलताना सांगितले.

सर्वधर्मीय मोफत सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

केदारनाथ उंबरजे मित्रपरिवार व वात्सल्य प्रतिष्ठान शेळगी यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबादप्रमाणे यंदाही सर्वधर्मीय मोफत सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महालिंगप्पा परमशेट्टी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

येत्या ९ मार्च रोजी सायं. ६.३० वा. हा विवाह सोहळा शेळगी येथे संपन्न होणार असून सहयोजकाच्यावतीने नवरदेवासाठी सफारी ड्रेस, वधूसाठी शालू, मंगळसूत्र, जोडवे, साहित्य संसार उपयोगी साहित्य दिले जाणार आहे. हा विवाह सोहळा यशस्वी करण्यासाठी विविध समित्या गठीत करण्यात आले आहेत. शहर आणि परिसरातील विविध ज्येष्ठ मंडळीचे या कामी सहकार्य लाभत असल्याचेही उंबरजे यांनी सांगितले. विवाहेच्छुक वधूवरांनी २८ फेब्रुवारीपर्यंत नाव नोंदणी करावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या पत्रकार परिषदेस महालिंगप्पा परमशेट्टी, सिध्दाराम तंबाके आदी उपस्थित होते.

अंगध मुके यांच्या वचपा कादंबरीचे प्रकाशन

सुराज्य/सोलापूर

सेवानिवृत्त फौजदार अंगध मुके यांच्या वचपा कादंबरीचे प्रकाशन डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात नुकतेच मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक दत्ता गायकवाड, ग्रामीण कथाकार योगीराज वाघमारे, सेवानिवृत्त अधिकारी दैठणकर, प्रचार्य के. आप्पासाहेब, पंकज शिंदे, प्रकाशक विजय गायकवाड, मुख्याध्यापिका पुष्पा मुके, आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात ओळख संविधानाची या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक देण्यात आले.

भगवती गौरीमाता शिक्षण संकुलात आनंद मेळावा उत्साहात

सुराज्य/सोलापूर

धोत्री येथील श्री भगवती गौरीमाता प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या ६७ व्या पुण्यतिथी निमित्त आनंद मेळावा उत्साहात पार पडला.

अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे होते. व्यासपीठावर प्रमुख पाहणे म्हणून दर्गनहळ्ळीचे युवा नेते महेश दादा बिराजदार, शालेय समितीचे ज्येष्ठ सदस्य गुरुमोर्ती पाटील, शरणप्पा बिराजदार, विठ्ठल रामपुरे, पोलिस पाटील श्रीमंत पाटील, पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा सरोजिनी यारगले, मुख्याध्यापक केदार माळी, पर्यवेक्षक रामेश्वर झाडे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे सदस्य, पालक शिक्षक संघाचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक संयोजन समितीचे प्रमुख प्रा. स्वामीनाथ कलशेट्टी यांनी केले. मुख्याध्यापक केदार माळी व पर्यवेक्षक रामेश्वर झाडे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागतपर सत्कार केले. यावेळी विद्यार्थ्यांनी ३० स्टॉल मांडले होते.दक्षता समितीत अण्णासाहेब सुतार, संजय बिराजदार, प्रा.दत्तात्रय बिराजदार, भानुदास राठोड, राजमाने, श्री संजय पाटू सर, श्री रवि माळी सर, भिमाशंकर बिराजदार, सुरेश यागरे आदींनी काम पाहिले.

परीक्षक म्हणून प्रकाश कारभारी व मल्लिकार्जुन गुरव यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन प्रा.स्वामीनाथ कलशेट्टी व आभार प्रा. दत्तात्रय बिराजदार यांनी केले.

सांगोला विधानसभा मतदारसंघासाठी २९ कोटींचा निधी मंजूर आ. पाटील

सुराज्य/सांगोला

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा २ आशियाई विकास बँक अर्थसाह्य अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील १८५ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे दर्जोन्नत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून १७० कोटी ७३ लाख ४८ हजार निधीची तरतूद झालेली असून त्यापैकी सांगोला विधानसभा मतदार संघासाठी ३५ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी २९ कोटी रूपये निधीची तरतूद करण्यात आलेली असून सदर कामांची ५ वर्षे नियमित देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी १ कोटी ८७ लाख ८७ हजार निधीची तरतूद केली असल्याची माहिती आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली.

महाराष्ट्र शासनाकडून ग्रामीण भागातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गाच्या बळकटीकरणासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमधून निधी दिला जात असतो. सांगोला विधानसभा मतदारसंघासाठी मिळालेल्या २९ कोटी निधी मधून पंढरपूर तालुक्यातील १ व सांगोला तालुक्यातील ५ असे एकूण ६ रस्ते आहेत. यामध्ये गार्डी ता.पंढरपूर ते मोरे वस्ती रस्ता (४ किमी) - ३१०.९० लक्ष, इटकी ता.सांगोला ते खांडेकर वस्ती राजेवाडी साखर कारखाना रस्ता (४किमी) - ४३५.८६ लक्ष, कोळा ता.सांगोला ते तिप्पेहळी ते घोरपडी तालुका हद्द (एनएच १६६) (३ किमी) रस्ता - २४२.१७ लक्ष, वाढेगाव ता. सांगोला ते राजापूर रस्ता (४ किमी) - २७०.८३ लक्ष, खवासपूर ता.सांगोला ते उंबरगाव रस्ता (५.६००किमी) - ४६६.७२ लक्ष, सांगोला ते अजनाळे, बलवडी शिंदे वस्ती रस्ता (१४.३ किमी) - ११६६ लक्ष असे एकूण २९ कोटी निधीची तरतूद केलेली असून त्याच्या पाच वर्षाच्या देखभाल दुरुस्तीसाठी १ कोटी ८७ लाख ८७ हजार रुपये निधीची तरतूद केलेली आहे. ग्रामीण भागातील ३५ किलोमीटर लांबीचे रस्ते मजबुरीकरण होणार आहेत अशी माहिती आमदार शहाजी बापू पाटील यांनी दिली.

सकारात्मक भूमिका घेत बारमधील ऐक्य कायम ठेवावा : न्या.चव्हाण

सुराज्य/सोलापूर

सर्वांनी सकारात्मक भूमिका घेत बारमधील ऐक्य कायम ठेवावा. बार-बेंचमधील संबंध सौहार्द्राचे ठेवा. यातून सर्वच प्रश्न मार्गी लागतील. बारची परंपरा उत्तम आहे. बारचे सर्व प्रश्न येत्या वर्षाअखेरीस सुटतील, अशी ग्वाही मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा सोलापूर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती पी.के. चव्हाण यांनी दिली.

न्यायमूर्ती चव्हाण हे रविवारी करमाळा येथील वरिष्ठस्तर दिवाणी न्यायालयाच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या निमित्ताने सोलापूर दौर्यावर आले असता त्यांनी शनिवारी सकाळी सोलापूर वकील संघाला सदिच्छा भेट दिली.त्यावेळी ते बोलत होते. यावेळी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुरेश गायकवाड यांनी सर्वांच्यावतीने त्यांचे स्वागत केले.या कार्यक्रमास बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे माजी चेअरमन ॲड.मिलिंद थोबडे, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत, उपाध्यक्ष असिम बांगी, सचिव करण भोसले, सहसचिव अनिता रणश्रृंगारे,खजिनदार अविनाश काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी न्यायमूर्ती चव्हाण यांचा परिचय ॲड.बांगी यांनी केला.त्यानंतर अध्यक्ष ॲड.गायकवाड यांनी वकील संघाच्या समस्यांचे निवेदन सादर करून सर्व मागण्यांचा पाठपुरावा प्रशासकीय पातळीवर तातडीने व्हावा,अशी मागणी केली.यावेळी जेष्ठ सदस्य ॲड.जी.एस.आडम व ॲड.व्ही.सी.दरगड यांनी देखील काही अडचणी मांडल्या.या कार्यक्रमास आशोक जालादी, संजीव सदाफुले, डी. एस.चव्हाण, अनिल माळगे, एन.के.शिंदे, रवींद्र पाटील, महेश सोलनकर, राजेंद्र फताटे, अजय रणश्रृंगारे, बाबासाहेब जाधव, सुरेश पाटील-कुरुलकर आदी वकिल उपस्थित होते.

खेड येथे तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

सोलापूर-एका अठरा वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना खेड (ता.उत्तर सोलापूर) येथे शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

सिध्दनाथ मच्छिंद्र देवकते (वय १८ रा. खेड ता.उ.सोलापूर) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. काल सायंकाळी पाच वाजता सुमारास त्याने घराजवळील पत्रा शेडमध्ये छताच्या अँगलला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. त्याला फासातून सोडवून समाधान भोसले(नातेवाईक) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वीच मयत झाला. मयत सिध्दनाथ देवकते हा बारावी उत्तीर्ण असून तो आयटीआय मध्ये प्रशिक्षण घेत होता. त्याच्या पश्चात आई-वडील आणि बहीण असा परिवार आहे. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार स्वामी पुढील तपास करीत आहेत.

सुस्ते येथे चुलीवर स्वयंपाक करताना महिला भाजली

सोलापूर-चुलीवर स्वयंपाक करताना २५ वर्षीय विवाहिता भाजून जखमी झाली. ही घटना सुस्ते (ता.पंढरपूर) येथे रविवारी दुपारच्या सुमारास घडली. सिमा पिंटू कांबळे (वय २५ रा.यलदरी जि.हिंगोली,सध्या रा.सुस्ते) असे भाजलेल्या विवाहितेचे नाव आहे. तिला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून पतीने सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. ती दुपारी चुलीवर स्वयंपाक करीत होती. त्यावेळी अचानक तिच्या साडीला आग लागली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

यल्लमावाडी येथे चाकूने हल्ला; किशोरवयीन तरुण जखमी

यल्लमवाडी (ता.मोहोळ) येथील शेतात दुसऱ्याचे भांडण सोडविण्यात गेला असता, मधे का आला? म्हणून पाठीमागून चाकूने केलेल्या हल्ल्यात प्रशांत पंडित काळे (व १७) हा तरुण जखमी झाला. ही घटना रविवारी दुपारच्या सुमारास घडली. तिला उपचारासाठी सुवर्णा काळे (आई) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

देवीचीमाळ येथे दगडाने मारहाण

देवीचीमाळ (ता.करमाळा) येथे माझ्याविरुद्ध पोलिसात केस का केली? या कारणावरून दगड आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत अमोल मुरलीधर पवार (वय ३५) हा जखमी झाला. ही घटना रविवारी सकाळी गावातील पवारवस्ती येथे घडली. त्याला करमाळा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात रेश्मा (पत्नी) यांनी दाखल केले. त्याला सुरज भाऊसाहेब पवार आणि गणेश गायकवाड या दोघांनी मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

सव्वा महिन्याच्या बालकाचा मृत्यू

शहरातील भारत नगर (कुमठा नाका)येथे राहणारा अनिकेत परशुराम केंगार (वय ४० दिवस) हा बालक रुग्णालयात उपचारापूर्वी मयत झाला. रविवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास त्याला दूध पाजल्यानंतर तो झोपला होता.१० वाजता तो बेशुद्ध अवस्थेत आढळला. त्याला संतोष पाटोळे (आजोबा) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे.

मुंढेवाडी येथे दगडाने मारहाण एक जखमी

मुंडेवाडी (ता.मोहोळ) येथे शेतातून वाळू उपसण्यासाठी मार्ग द्या म्हणून विचारण्यात गेले असता दगड आणि लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणीत सुरेश बसवंत लोखंडे (वय ५९ रा.अभिमान श्रीनगर सोलापूर) हे जखमी झाले. ही घटना शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. विकास ढेरे आणि सुभाष ढेरे या दोघांनी मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

विवेकवर्धिनी विद्यालयाचा राहुल धोत्रे महाराष्ट्रात प्रथम

सुराज्य/सोलापूर : विवेकवर्धिनी विद्यालयाचा इयत्ता अकरावी आर्टमध्ये शिकत असलेला राहुल बळी धोत्रे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत भालाफेक स्पर्धेत महाराष्ट्रात प्रथम आला आहे. यानिमित्त त्याचा सत्कार समारंभ संस्थेचे अध्यक्ष डॉ. मदन क्षीरसागर यांच्या हस्ते विवेकवर्धिनी कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष डॉ. मदन क्षीरसागर यांनी सांगितले की, 'आपल्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातून सर्व क्षेत्रात विद्यार्थी नेत्रदीपक कामगिरी करत आहेत. विद्यार्थ्यांनी मेडिकल, इंजिनिअरिंग बरोबरच इतरही अनेक क्षेत्रे आपल्यासाठी उपलब्ध आहेत त्यामध्येही मोठ्या प्रमाणावर करिअर करण्याची संधी उपलब्ध असते याची माहिती सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सतत द्यावी, पाठ्यपुस्तक अभ्यासक्रमाबरोबर बदलत्या काळाप्रमाणे विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याची आता गरज आहे, त्याप्रमाणे सर्वांनी काम करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. शाळा आणि संस्था विद्यार्थ्यांना सर्वप्रकारचे सहकार्य करण्यास कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन केले. यावेळी राहुलला मार्गदर्शन करणारे महादेव रणदिवे व राहुल दळवी यांचाही सन्मान करण्यात आला. अध्यक्षस्थानी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पाराध्ये होते. प्रास्ताविक कनिष्ठ महाविद्यालय विभाग प्रमुख उत्तरेश्वर मुंढे यांनी केले.

प्रत्येक क्षेत्रात कठोर परिश्रमाची गरज : डॉ. चित्रे

'यु ग्रुप्स व स्वेरी' यांच्यात सामंजस्य करार

सुराज्य/पंढरपूर

विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊन पुढे नोकरीबरोबरच उद्योगधंद्यामध्ये करिअर करावे. उद्योग-व्यवसाय करण्यासाठी बुद्धीची जोड द्यावी लागते. अभियांत्रिकी शिक्षणाच्या माध्यमातून बौद्धिक उर्जा अधिक प्रमाणात मिळते. व्यावसायिक पार्श्वभूमीवर अभियांत्रिकीचे शिक्षण हे सर्वात सरस असून या ज्ञानाचा व्यवहारात विशेष उपयोग होतो. नोकरी व उद्योगाच्या प्रत्येक क्षेत्रात अभियांत्रिकी शिक्षणाचा फायदा होतो. अभियांत्रिकी शिक्षणातून अनेक अडचणी सुटू शकतात. यासाठी आपल्यामध्ये असलेल्या गुणवत्तेला प्रथम प्राधान्य द्या. करिअर करताना अडचणी आल्यानंतर त्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करा आणि हे करत असताना प्रत्येक क्षेत्रामध्ये कठोर परिश्रम करा', असे प्रतिपादन डॉ. संजीव चित्रे यांनी केले

स्वेरीमध्ये 'प्रोजेक्ट टू प्रॉडक्ट अँड प्रॉडक्ट टू स्टार्टअप' या विषयावर अमेरिकेच्या लॉस गॅटोस, कॅलिफोर्निया येथील यु ग्रुप्सचे संचालक डॉ. संजीव चित्रे हे स्वेरी अंतर्गत असलेल्या इंजिनिअरिंग, फार्मसी एमबीए व एमसीएमधील विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्राध्यापकांना मार्गदर्शन करत होते. संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी पाहुण्यांचे स्वागत करून विद्यार्थ्यांना या उपक्रमाची का आवश्यकता आहे? हे स्पष्ट करून स्वेरीच्या वाटचालीतील महत्वाचे टप्पे, मिळालेला निधी, महत्वपूर्ण मानांकने, शिक्षणात राबविण्यात येणारे विविध उपक्रम, संशोधन विभागाची गरुड झेप याबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी आयुर्वेदाचा अभ्यास व बायोवेद उत्पादनांची जगभर प्रसिध्दी होण्यासाठी मोठे कार्य करत असलेल्या डॉ. दीपा चित्रे म्हणाल्या की, 'जगातील उद्योगासमोर आपल्याकडील मूलभूत उत्पादनांचे महत्व पटवून दिले पाहिजे. जोपर्यंत उत्पादनाची गुणवत्ता सिध्द होत नाही तोपर्यंत जनतेचा विश्वास त्या उत्पादनावर बसत नाही. आपल्या उत्पादनाची क्षमता वाढवली पाहिजे. तरुणांनी पुढे येऊन धाडसाने आपली गुणवत्ता दाखवण्याची गरज आहे. उद्योग क्षेत्रामध्ये तरुणांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करणे गरजेचे आहे.' पुढे मार्गदर्शन करताना डॉ. संजीव चित्रे म्हणाले की, 'भारतातून

अमेरिकेत गेल्यानंतर माणसाचा रोजच्या जीवनात लागणाऱ्या अनेक गोष्टींच्या उत्पादनाचा मी अभ्यास केला. त्या अनुषंगाने माणसे गोळा करून नवी उत्पादने व बाजारपेठा निर्माण केल्या. उद्योजक म्हणून कार्यरत राहण्यासाठी अचूक निरीक्षण, संयम व ज्ञान मिळवण्याची कृती विकसित करणे गरजेचे आहे.' असे सांगून त्यांनी यशस्वी उद्योजकांची उदाहरणे दिली. यावेळी इंजिनिअरिंग व फार्मसी मधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे व त्यातून उद्योजकतेला चालना देणे यासाठी यु ग्रुप्स व स्वेरी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

यावेळी पार्थ पॅक्केलचे संचालक व सीए अजय अधिकारी, नेहा अधिकारी, वास्तुतज्ञ प्रदीप वढावकर, मीना वढावकर तसेच स्वेरी अंतर्गत असलेल्या बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतीश मांडवे यांच्यासह इंजिनिअरिंग व फार्मसीचे प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ यांनी आभार मानले.

न्यासाचे सेवा कार्य सातासमुद्रापार : अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड

सुराज्य/अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाचे सेवा कार्य सातासमुद्रापार केल्याचे मनोगत स्वराज्य रक्षक संभाजी राजे या मालिकेतील महाराणी येसूबाईची भूमिका केलेले प्रसिध्द अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड यांनी यांनी व्यक्त केल्या.त्या तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

यावेळी न्यासाचे सचिव शामराव मोरे, पुरोहित अप्पू पुजारी, एस. के. स्वामी, सिध्दाराम कल्याणी, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, राहुल इंडे, बाळासाहेब यादगे, दत्ता माने, पिंटू साठे, शरद भोसले, महांतेश स्वामी, सागर याळवार, समर्थ यादगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

आजपासून जुने दत्त मंदिरात गुरुप्रतिपदानिमित्त पालखी प्रदक्षिणा

सोलापूर : प्रतिवर्षीप्रमाणे श्री जुने दत्त मंदिर, दत्त चौक, सोलापूर येथे दि. ६ फेब्रुवारी २०२३ ते माघ कृ. चतुर्थी दि. ९ फेब्रुवारी २०२३ दरम्यान गुरुप्रतिपदा उत्सव साजरा होणारा असून उत्सवादरम्यान सकाळी 'श्री' च्या मूळ पादुकांस अभिषेक, दुपारी मध्यान्ह आरती सायंकाळी महाआरती व पालखी प्रदक्षिणा होईल. दि. ९ फेब्रुवारी संध्याकाळी ५ वाजता महाआरती होईल त्यानंतर पालखी नगर प्रदक्षिणा होईल.

गुरुप्रतिपदा म्हणजेच द्वितीय दत्तावतार श्रीमन् नृसिंह सरस्वती महाराजांनी निजानंदी गमन केले तो दिवस. दत्त संप्रदायात या दिवसाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. गाणगापूर, नृसिंहवाडी व औदुंबर या दत्तक्षेत्री हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गाणगापूर येथे माघ कृ. प्रतिपदा, नृसिंहवाडी व औदुंबर येथे माघ कृ. पंचमीला निजानंदीगमन सोहळा साजरा केला जातो. त्याचप्रमाणे श्री जुने दत्त मंदिर,दत्त चौक, सोलापूर येथेही माघ कृ. चतुर्थी रोजी नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचा निजानंदीगमन सोहळा शेकडो वर्षांपासून साजरा केला जातो.

नगर प्रदक्षणा मार्ग :- जुने दत्त मंदिर - जुने विठ्ठल मंदिर - टिळक चौक - फलटण गल्ली - मंगळवार पेठ पोलीस चौकी - गोविंद बुवा मठ(बलिदान चौक) - मधला मारुती - माणिक चौक - गद्रे लक्ष्मी मंदिर - गणपती घाट (श्रीं 'स अवभृत स्नान) - जुने दत्त मंदिर.

पाटकूल शिवारातील शेतकऱ्यांचे डोळे सरकारच्या मदतीकडे

सुराज्य/चिखली

मोहोळ तालुक्यातील पाटकुल शिवारातून जाणारा उजनी पाटबंधारे विभागाचा उजवा डावा कालवा दिनांक २९ रोजी फुटल्याने शेकडो एकर शेती पाण्याखाली गेली, शेतात ऊस, द्राक्ष, डाळिंब यासह अन्य हातातोंडाशी आलेली पिके वाहून गेली. अनेक शेतकऱ्यांच्या घरातही पाणी शिरलं. काही शेतकऱ्यांच्या विहिरी गाळाने गाचोगाच भरल्या यासह अन्य नुकसानीचे पंचनामे सुध्दा झाले आहेत. आता या भागातील शेतकऱ्यांचे डोळे सरकारच्या मदतीकडे लागले आहेत.

पाटकूल शिवारातून जाणाऱ्या उजनीच्या डाव्या कालव्यामध्ये शेतीसाठी १८ जानेवारीपासून उजनी धरणातून पाणी सोडण्यात आले होते. हा उजनी डावा कालवा दि. २९ जानेवारी रोजी पाटकूल हद्दीतील खरात वस्ती जवळ फुटला होता. त्यावेळी कालव्यातून ५०० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने शेकडो एकर जमिनी पाण्याखाली गेल्या.

विहिरी गाळाने काठोकाठ भरल्या, शेततळी तर भुईसपाट झाली, गहू आदी पिकांसह डाळिंब, द्राक्ष, केळी अन्य पिकांबरोबरच इलेक्ट्रिक मोटारी देखील वाहून गेल्या. एवढेच नव्हे तर ज्यांच्या जमिनी खरडून वाहून गेल्या आहेत. त्यांचे तर नुकसान झालेच परंतु ज्यांच्या जमिनी खरडून गेलेल्या आहेत. त्यांच्या जमिनीत माती तर राहिलीच नाही शिवाय खडक सुध्दा कुठं बघायला राहिला नाही. त्यामुळे त्यांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

विशेष म्हणजे - शेतकऱ्यांच्या जमिनीतून जेवढी माती वाहून गेलेली आहे तेवढी माती नव्याने जमिनीत भरून आणि जमिनीची लेवल काढून सपाटीकरण केल्याशिवाय शेतकऱ्यांना पर्याय नाही. शिवाय या गोष्टी नाही केल्या तर भविष्यात जमिनीत काहीच पिकणार नाहीत ही अवस्था आहे. तर दुसरीकडे फळबागा पाण्याच्या वेगाने कोलमडून गेल्या आहेत त्या उभ्या करणे ठिबक सिंचन संच वाहून गेले ते पुन्हा नव्याने तयार करणे या काय कमी खर्चाच्या किंवा सोप्या गोष्टी नाहीत, त्या देखील शेतकऱ्यांना तातडीने कराव्या लागणार आहेत अशी अवस्था आहे.

त्यामुळे सदर नुकसानीचे पंचनामे तातडीने करून शेतकऱ्यांना मदत त्वरित मिळावी म्हणून कागदी घोडे नाचवून आटापिटा केला खरे पण, या भागातील शेतकऱ्यांना जेवढे नुकसान झाले आहे तेवढी तर नुकसान भरपाईची मदत मायबाप सरकारकडून तातडीने मिळणार का? असे सवाल उपस्थित करत अनेक प्रश्नांनी शेतकऱ्यांचे डोके सुन्न झाल्याचे चित्र दिसत आहे.

बेशिस्तपणे ट्रॅक्टर चालविणाऱ्या विरुद्ध कारवाईची मागणी

सुराज्य/पिलीव : सध्या पिलीव येथील महालक्ष्मी देवीची यात्रा भरत आहे. यामुळे या रस्त्यावर प्रचंड गर्दी असते. नुकताच अशाच घटनेत बचेरी येथील श्रध्दा पाटील या तरुणीचा बळी गेला आहे. अशा बेशिस्त ट्रॅक्टर चालकावर कारवाई करावी, अशी मागणी युवासेना तालुका अध्यक्ष सुभाष काकडे यांनी पिलीव पोलीस स्टेशनला निवेदन देऊन केली आहे.

यावेळी तालुका उपाध्यक्ष डॉ. निलेश कांबळे, प्रा. शंकर शिंदे, योगेश देशमुख, महेश देशमुख, प्रभाकर देशमुख, मंगेश लोखंडे, संतोष झेंडे, अर्जुन लोखंडे, संजय पाटील उपस्थित होते. सदरचे निवेदन पिलीव पोलीस स्टेशनचे ठाणे अंमलदार पंडित मिसाळ, दत्ता खरात, अमित जाधव यांनी स्विकारले. तर निवेदन स्विकारल्यानंतर बेशिस्त वाहन चालकांवर नक्की कारवाई करण्याचे आश्वासन ठाणे अंमलदार पंडित मिसाळ यांनी दिले.

शिवसेनेतर्फे सरकारी योजनांचे महाशिबिर

नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे स्वागत नगर येथील केंगनाळकर शिक्षण संकुलाच्या मैदानात सरकारी योजनांचे महाशिबिर होणार आहे. दर बुधवारी दिवसभर या ठिकाणी हे शिबिर होणार आहे.

या शिबिराचे उद्घाटन रविवारी जिल्हाप्रमुख अमर पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी व्यासपीठावर शिवसेनेचे शहरप्रमुख विष्णू कारमपुरी, संयोजक आणि उपजिल्हाप्रमुख संतोष केंगनाळकर, महिला आघाडी जिल्हा संघटिका अस्मिता गायकवाड, उपजिल्हाप्रमुख भीमाशंकर म्हेत्रे, शहर संघटक अतुल भवर, अक्कलकोट तालुकाप्रमुख आनंद बुक्कानुवरे, दक्षिण विधानसभा संघटक राजू बिराजदार, शहर विभाग संघटक रविकांत कांबळे, उपशहर प्रमुख सचिन गंधुरे, सचिन चौगुले आदी उपस्थित होते.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे आयुष्यमान भारत कार्ड, मतदार नोंदणी, श्रम कार्ड, आधारकार्ड नवीन व दुरुस्ती तसेच प्रधानमंत्री आवास योजना, बांधकाम कामगार आवास योजना, जातीचा दाखला, उत्पन्न दाखला त्याचबरोबर इतर सरकारी योजनांची माहिती आणि सुविधा दर बुधवारी दिवसभर केंगनाळकर शिक्षण संकुलाच्या आवारात मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याचा नागरिकांनी, कामगारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमर पाटील यांनी केले.

शिबिराचे संयोजक आणि शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संतोष केंगनाळकर यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी जिल्हाप्रमुख अमर पाटील, शहरप्रमुख विष्णू कारमपुरी, महिला आघाडी जिल्हा संघटिका अस्मिता गायकवाड, उपजिल्हाप्रमुख भीमाशंकर म्हेत्रे, शहर संघटक अतुल भवर आदींनी मनोगत व्यक्त केले. सरकारी योजनांची सुविधा घेण्यासाठी यावेळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

अलका कुबल आणि निर्मिती सावंत पहिल्यांदाच एकत्रित दिसणार

सुराज्य/सोलापूर

'आलंय माझ्या राशीला' हा त्यांचा मराठीतील मल्टिस्टारर चित्रपट खऱ्या अर्थानं वेगळेपण जपणारा असून, उत्सुकता वाढवणारा आहे. 'आलंय माझ्या राशीला' या चित्रपटातून आनंद पिंपळकर बारा राशींच्या अनोख्या गोष्टी येऊन आले आहेत.

हा चित्रपट १० फेब्रुवारीला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. आनंदीवास्तू आणि साईकमल प्रॉडक्शन निर्मित आणि फिल्मास्त्र स्टुडिओ प्रस्तुत 'आलंय माझ्या राशीला' या चित्रपटाचे निर्माते आनंद पिंपळकर आणि अश्विनी पिंपळकर आहेत.

दिलीप जाधव सहनिर्माते असून, दिग्दर्शन अजित शिरोळे यांनी केलं आहे. या चित्रपटाच्या निमित्तानं अलका कुबल आणि निर्मिती सावंत या मनोरंजन विश्वातील महाराण्या एकत्र आल्या आहेत.

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानचे युवा प्रेरणा पुरस्कार जाहीर

सुराज्य/सोलापूर

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्यावतीने देण्यात येणारे युवा प्रेरणा पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. रविवार दि. १२ फेब्रुवारी २०२३ रोजी दुपारी १ वाजता हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश कासट यांनी दिली.

युवा दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा या पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. रविवारी रंगभवन समोरील समाजकल्याण केंद्रात हा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. पुरस्काराचे हे तिसरे वर्ष आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर सोडल, उद्योजक हर्षल कोठारी, रेल्वेचे कर्मचारी व कल्याण मुख्य निरीक्षक सचिन बनसोडे, पद्मावती बालक आश्रमच्या संचालिका ज्योत्स्ना पाटील, उद्योजक राहुल चंडक, पंचशील माध्यमिक प्रशालेचे अध्यक्ष श्रीशैल रणधिरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यास सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थापक महेश कासट, संतोष अंलकुटे, प्रकाश आंळगे, केशव भैय्या, गोपाल धुत, अभिजित व्होनकळस, गणेश वेळमेली, आकाश लखोटिया, श्रीपाद सुत्रावे यानी केले आहे.

पुरस्काराचे मानकरी - ॲड. सुमित रघोजी, उद्योजिका सोनाली खानापूर, डॉ. सुमित तंबाके, राज्यकर निरीक्षक बुध्दजय भालशंकर, ९५ एफ.म.चे डिजे अमृत ढगे, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद कांरडे आदी या पुरस्काराचे मानकरी आहेत. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

आई रागावल्याने अल्पवयीन तरुणीची विष पिऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर : सोलापूर-शाळेत जात नसल्यामुळे आई रागावली म्हणून एका १७ वर्षीय अल्पवयीन तरुणीने विष पिऊन आत्महत्या केली. ही घटना बोरीउमरगे (ता. अक्कलकोट) येथे घडली. श्वेता दत्ता उंबरजे (वय १७ रा. बोरी उमरगे) असे मयत झालेल्या तरुणीचे नाव आहे.

शनिवारी (२८ जानेवरी) रोजी सकाळच्या सुमारास तिची आई शाळेत जात नसल्याने रागावली होती. त्यानंतर तिने रागाच्या भरात पिकावर फवारणीचे विषारी द्रव प्राशन केली होती. तिला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून ३१ जानेवारी रोजी वडिलांनी तिला सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. ती शनिवारी सकाळी मयत झाली. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली. प्राथमिक तपास हवालदार स्वामी करीत आहेत.

ललितादेवी जामदार यांचे निधन

सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील ललितादेवी बबनसिंग जामदार यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ८२ वर्षाच्या होत्या. निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

पखवाज वादनातून सद्गुरु श्री प्रभाकर स्वामी महाराजांना अभिवादन

माघी पौर्णिमेनिमित्त मंदिरात भाविकांची प्रचंड गर्दी

सुराज्य/सोलापूर

एकाच वेळी लयबद्धपणे वाजवणारे ३५ पखवाज. त्यातून उमटणारा भक्तिमय नाद आणि सद्गुरु श्री प्रभाकर स्वामी महाराजांचा होणारा जयघोष अशा वातावरणात रविवारी सम्राट चौकातील सद्गुरु श्री प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात सद्गुरु श्री प्रभाकर स्वामी महाराजांना अभिवादन करण्यात आले. महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त मंदिरात रविवारी विविध धार्मिक कार्यक्रम झाले.

रविवारी सकाळपासून अखंड नामजप सप्ताह, श्री गुरुगीता पारायण झाले. तसेच सकाळी श्री प्रभाकर अनुसंधान या पोथीचे सामूहिक अनुष्ठान मीना जोशी यांच्या अधिपत्याखाली झाले.

अखिल भाविक वारकरी मंडळाचे प्रदेशाध्यक्ष ज्योतीराम महाराज चांगभले यांच्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एकाच वेळी ३५ पखवाजांचे सामूहिक वादन करून सद्गुरु श्री प्रभाकर स्वामी महाराजांना अभिवादन केले. यावेळी प्रणिती चांगभले, दत्ता महाराज सरवदे आणि ज्ञानेश्वर वाघमारे यांनी गायन सेवा केली. प्रणिती चांगभले यांनी पखवाज अन् टाळ वादन करत गायन सेवाही रुजू केली. यानंतर विद्यार्थी आणि विद्यार्थिनींमध्ये झालेल्या पखवाज वादनाच्या जुगलबंदीने मंदिरातील वातावरण भक्तीमय झाले होते. सायंकाळी माघी पौर्णिमेनिमित्त सद्गुरु श्री प्रभाकर स्वामी महाराज मंदिरास पालखी प्रदक्षिणा मोठ्या भक्तीमय वातावरणात झाली. यावेळी भाविकांनी मंदिरात मोठी गर्दी केली होती.

याप्रसंगी श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्टचे चीफ ट्रस्टी दत्तात्रय देशमुख, मॅनेजिंग ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे, ट्रस्टी उदय वैद्य, वसंत बंडगर, ट्रस्टी सदस्य वामन वायचौरे, मोहन बोड्डू, रवी गुंड, सम्राट राऊत, रमेश देशमुख, रामभाऊ कटकधोंड, प्रभाकर कुलकर्णी, सुभाष बद्दूरकर, प्रकाश कोथिंबीरे, व्यवस्थापक निरंजन दंतकाळे आदी उपस्थित होते.

आज होणार गुलालाचा कार्यक्रम

श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज यांच्या ६६ व्या पुण्यतिथीनिमित्त आज (सोमवारी) रात्री १०.४५ वाजता श्री प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात गुलालाचा कार्यक्रम होणार आहे. यावेळी भाविकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्टने केले आहे.

पत्रकारांनी निर्भिडपणे पुढे येण्याची गरज : आंबेडकर

अकलूज येथे मूकनायक परिसंवाद कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

सुराज्य/अकलूज

मूकनायकमुळे अबोल असलेली माणसे बोलू लागली. साहित्य निर्मितीला अंकुर फुटले. आज पत्रकारीतेचे अंग कुठेतरी कमी पडताना दिसत आहे. यासाठी व्यवस्थेला हादरे देण्यासाठी पत्रकारांनी पुढे येण्याची गरज आहे, असे मत डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नातू भारतीय बौध्द महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर यांनी व्यक्त केले.

अकलूज येथे मूकनायक परिसंवाद कृती समितीच्या वतीने दि ४ फेब्रुवारी रोजी मूकनायक या वृत्तपत्राच्या १०३ व्या वर्धापन दिनानिमित्त मूकनायक परिसंवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी अभ्यासक

विचारवंत सत्येंद्र चव्हाण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य धैर्यशील मोहिते- पाटील, भंते बी. सारीपुत्त आदिसह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत गौतम बुध्द व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्रिशरण पंचशील ग्रहण करण्यात आले.

यावेळी धैर्यशील मोहिते -पाटील बोलताना म्हणाले की, अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये मूकनायकची निर्मिती करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकांना बोलते केले. लोकांच्या व्यथा त्यांनी मांडल्या. त्यामुळे शोषित पिडीतांना न्याय मिळाला.

यावेळी व्याख्याते डॉ. सत्येंद्र चव्हाण यांनी आपल्या ओघवत्या भाषेतून इतिहासाचा परामर्श घेत अनेक संदर्भ देत छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भीमा कोरेगाव आदी विषयांचा उलगडा केला.

महारांचा लष्करी व सांस्कृतिक इतिहास याबाबतचे त्यांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते राजू लोहकरे व अशोक कांबळे यांना पत्रकारितेतील आदर्श मूकनायक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मूकनायक कृती समितीचे नागेश लोंढे, आनंदकुमार लोंढे, बाळासाहेब गायकवाड, डी एस गायकवाड, गौतम भंडारे, सागर खरात, कैलास कांबळे, सुजित सातपुते त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

कार्यक्रमास परजिल्ह्यातील लोकांची उपस्थिती देखील पहावयास मिळत होती.

लाखोंच्या पुस्तकांची विक्री

या कार्यक्रमास्थळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) या शासकीय संस्थेकडून पुस्तकाचा स्टॉल उभारण्यात आला होता . त्याचबरोबर खासगी पुस्तके ही या ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध होती. यावेळी जवळपास १ लाख ७७ हजार रुपयांच्या पुस्तकांची विक्री झाली. या ठिकाणी भरवण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुर्मिळ छायाचित्रांना लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

माळीनगर येथील बुद्धविहाराचे लोकार्पण

माळीनगर : यशवंतराव आंबेडकर बुध्द विहार लोकार्पण सोहळा बाबासाहेबांचे नातू आदरणीय भीमराव यशवंतराव आंबेडकर राष्ट्रीय कार्याध्यक्ष बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून दि सासवड माळी शुगर फॅक्टरी माळीनगर चेअरमन राजेंद्र गिरमे, भारतीय बौध्द महासभेच्या जिल्हा पदाधिकारी धम्म रक्षिता कांबळे, शारदाताई गजभिये, अण्णासाहेब वायमारे, वंचित बहुजन आघाडीचे युवा प्रदेश कार्यकारणी सदस्य ऋषिकेश नांगरे पाटील, मुंबई युवा जिल्हाध्यक्ष साहेबराव वायमारे, नितीन सरवदे, गोपाळ घाडगे-देशमुख, सुभाष ओव्हाळ, भारतीय बौध्द महासभा माळीनगरचे अशोक लोंढे, सदाशिव वायमारे, संजय तडवळकर, अरुण सोनवणे, मनोहर शिंदे, अजित नाईकनवरे, श्रीमंत माने, तुषार लोंढे, विकास कांबळे, किरण मोरे,अभिमान जगताप, सोपान चंदनशिवे, कामगार प्रतिनिधी उमेश जगताप, सुभाष कांबळे, विठ्ठल जाधव, गजेंद्र मसवडे, अमोल बनसोडे, प्रकाश कांबळे, शकील शेख आदी उपस्थित होते.

कल्पकता आणि नेतृत्वाने अन्नछत्राचा विकास : न्या. कुलकर्णी

अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या विकासा पाठीमागे निर्णय प्रक्रियेतेला वेग, भक्तांचे नेटवर्किंग, कल्पकता आणि नेतृव असल्याचे मनोगत औरंगाबाद जिल्हा न्यायाधीश विजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले. ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र (ट्रस्ट) मंडळात सहकुटुंब आले असता मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, सिध्दाराम कल्याणी, एस.के.स्वामी, बाळू पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, धानू उमदी, बाळासाहेब घाडगे, दत्ता माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

महाडीक महाविद्यालयास आमदार फंडातून संगणक

मोडनिंब : कला शाखेच्या विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने माढा तालुक्याचे आमदार बबनदादा शिंदे यांनी आमदार फंडातून मोडनिंबच्या मा.ह.महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालयास दहा संगणक संच मंजूर केले म्हणून श्रीमंत उमाबाई साहेब पटवर्धन स्मारक संस्थेचे सचिव ॲड.बी. एस. पाटील, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. शिवाजीराव पाटील यांच्या हस्ते आमदार बबनदादा शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील भूगोल विषयाचे प्रा.डॉ. सुभाष गायकवाड, इतिहास विषयाचे प्रा. पाटील एच. पी., महाविद्यालयाचे ओएस गहिनीनाथ कदम, सीनियर क्लार्क राजेंद्र गिड्डे, उपस्थित होते. अध्यक्ष व्हीके पाटील यांनी व सर्व संस्था विश्वस्त, सभासद, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी वर्गामधून समाधान व्यक्त केले जात आहे.

उत्तर सोलापूरमध्ये संत रविदास जयंती साजरी

उत्तर सोलापूर : उत्तर सोलापूर संत शिरोमणी रविदास महाराज यांची जयंती विविध धार्मिक कार्यक्रमाने साजरी करण्यात आली. ग्रामपंचायत तिऱ्हे मध्ये सरपंच सरपंच सुरवसे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी अजय सोनटक्के, गुरुदेव गायकवाड,संजय राठोड,गोवर्धन जगताप, इराशेट्टी, राऊत, कवडे आदी उपस्थित होते. भोगावं येथे हरिदास वायमारे यांच्या हस्ते भजन व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.नान्नज ग्रामंचायत मध्ये सरपंच टोणपे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.यावेळी उपसरपंच दडे, अंधारे, शिवाजी टोणपे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.पंचायत समिती उत्तर सोलापूर मध्ये प्रतिमा पूजन तोडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

आ. मोहिते-पाटील यांच्या फंडातून तिऱ्हे येथे सभामंडप कामाचे भूमिपूजन

उत्तर सोलापूर : उत्तर सोलापूर उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे येथील श्रीदत्त मंदिरास आमदार रणजितसिंह मोहितेपाटील यांच्या फंडातुन देण्यात आलेल्या सभामंडपाच्या कामाचे भूमिपूजन सिध्देश्वर कारखान्याचे माजी संचालक तथा माजी उप सरपंच भारत जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राम जाधव विशाल जाधव,रावसाहेब गायकवाड, प्रताप मल्लाव, ब्रम्हदेव जाधव, हंसध्वज जाधव, श्रीपाल जाधव, राम चव्हाण, विशाल जाधव, सुनिल पवार,दिपक जाधव, रखमा गायकवाड, विवेक जाधव उपस्थित होते.

पहिल्या एक्सपेरियन्स सेंटरचे उद्घाटन

सोलापूर : भारतातील आघाडीची इलेक्ट्रिक स्कूटर उत्पादक एथर एनर्जीने आज होटगी रोड,सोलापूर, महाराष्ट्र येथे आपल्या पहिल्या एक्सपेरियन्स सेंटरचे उद्घाटन केले.हे नवीन एक्सपेरियन्स सेंटर,एथर स्पेस,हे ब्रँडचे राज्यातील १६ वे रिटेल आउटलेट आणि देशातील ९२ वे आउटलेट आहे.शहरातील ग्राहक आता राइडची चाचणी घेऊ शकतात आणि एथर ४५० एक्स आणि ४५० प्लस स्कूटर बुक करू शकतात.एथर ने ऑटोमोटिव्ह कार्यक्षमतेने प्रेरित होऊन ४५० एक्स आणि ४५० प्लस साठी स्पेस ग्रे,स्टिल व्हाइट,सॉल्ट ग्रीन,ट्रू रेड,कॉस्मिक ब्लॅक आणि लुनार ग्रे हे सहा नवीन रंग देखील सादर केले आहेत.महाराष्ट्राने ईव्हीचा अवलंब करण्याचा वेग वाढवला आहे आणि आमच्या स्कूटर्सची मागणी अनेक पटींनी वाढली आहे, असे रवनीत सिंग फोकेला पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.

कोन्हाळीसाठी निधी कमी पडू देणार नाही : आ. कल्याणशेट्टी

सुराज्य/अक्कलकोट

कोन्हाळी गावच्या सर्वांगीण विकासासाठी अजिबात निधी कमी पडू देणार नाही असे प्रतिपादन भाजपाचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

रविवारी, कोन्हाळी गावच्या ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रेच्या निमित्ताने १ कोटी विकासकामांचे भूमिपूजन अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आ.कल्याणशेट्टी बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच चिदानंद उण्णद होते.

यावेळी व्यासपीठावर भारतीय जनता पक्षाचे अक्कलकोट तालुका महिला उपाध्यक्षा, संजय गांधी निराधार योजना समितीचे सदस्या ज्योतीताई उण्णद,भाजपा अनु जाती जमाती तालुकाध्यक्ष निजपा गायकवाड, छात्र भारती राज्य संघटक सचिन बनसोडे,व ग्रामपंचायत उपसरपंच प्रतिका बनसोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जलजीवन मिशन अंतर्गत ८० लाख रुपये पाणी पुरवठा काम व दहा लाख मुस्लिम कब्रस्थान वॉल कंपाउंड आणि सात लाख रमाई आंबेडकर नगर येथे समाज मंदिर, दोन लाख खासदार निधीतून बोअर आणि पाण्याची टाकी, मल्लिकार्जुन मंदिराजवळ मंगल कार्यालय साठी दहा लाख रुपये असे जवळपास एक कोटी दहा लाखाचे कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी पुढे बोलताना आमदार कल्याणशेट्टी म्हणाले की, गावच्या विकास कामासाठी निधी कमी पडू देणार नाही पुढील आठवड्यात पुन्हा निधी देण्यात येणार आहे.

सरपंच, उपसरपंच यांच्यावर गावांनी जे विश्वास ठेवले आहे त्यासाठी त्यांनी गावच्या विकासाची प्रयत्नशिल राहणे गरजेचे आहे. गावच्या विकास कामासाठी कायम मी तुमच्या सोबत आहे.यावेळी ग्रामपंचायत सर्व सदस्य, पोलीस पाटील, ग्रामसेवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंद्रूप ठाण्याच्या हद्दीतील शेततळेधारक शेतकऱ्यांची बैठक

सहायक पोलीस निरीक्षक मांजरे यांचा उपक्रम

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शेततळेधारक शेतकऱ्यांची बैठक सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांच्या उपस्थितीत पार पडली.

यावेळी सहायक पोलीस निरीक्षक मांजरे यांनी मंद्रुप पोलीस स्टेशन हद्दीतील शेततळी धारक शेतकऱ्यांची बैठक घेऊन उपस्थित शेतकऱ्यांना शेततळ्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने मार्गदर्शन केले.

ते म्हणाले, उन्हाळा चालु झाल्याने शेतकरी शेततळ्याचे पाणी शेतासाठी वापरत असल्याने शेततळ्यावर शेतकरी, कामगार व त्यांची मुले यांची वर्दळ वाढत असते. लहान मुलांना शेततळ्याकडे जाऊ देऊ नये. शेततळ्याला वरील बाजूस तारेचे कंपाउंड करावे.

शेततळ्याच्या खालील बाजूस काट्याकुट्यांचे कंपाउंड करावे. शेततळ्याला एकच पक्का दरवाजा ठेवावा, त्याला कुलुप लावण्याची सोय असावी. तसेच शेततळ्यामध्ये प्रवेशाच्या ठिकाणी एक दोरखंड सोडलेला असावा, जेणेकरून कोणी शेततळ्यात पडले तरी शेततळ्याच्या कागदावरील शेवाळवर पाय न सटकता त्याला दोरखंडाला धरून वरती येता येईल.

शेततळ्याच्या जवळील मोटरचा स्टार्टर तळ्यापासून सुरक्षित अंतरावर ठेऊन त्याच्या केबल वायरला जोड नसावी, असे सांगून मांजरे यांनी दक्षता घेण्याचे आवाहन केले.

मागासवर्गीय समाजाच्या विकास कामांसाठी आ. राम सातपुते यांचा पाच कोटींचा निधी

सुराज्य/नातेपुते

माळशिरस तालुक्यातील मागासवर्गीय समाजाला माळशिरसचे आ. राम सातपुते यांच्या प्रयत्नाने मागासवर्गीय वस्ती मधील विविध सुधारणा कामाबाबत न भूतो न भविष्यती असा ५ कोटींचा निधी मिळाला असून या विकास कामांना लवकरच सुरुवात होणार असून विकासाच्या मुख्य प्रवाहात समाजाला आ. राम सातपुते यांनी आणल्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने माळशिरसचे आ. राम सातपुते यांचा लवकरच सत्कार करणार असल्याची माहिती आरपीआयचे माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांनी दिली ते माळशिरस येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

यावेळी या पत्रकार परिषदेस आरपीआयचे नेते दयानंद धाइंजे, जिल्हा युवा आघाडीचे कार्याध्यक्ष किरण धाईंजे, कार्याध्यक्ष समाधान भोसले, युवक सरचिटणीस प्रवीण साळवे, उपाध्यक्ष शेखर सावंत, संघटक शिवाजी ठोकळे, संजय भोसले, विनोद रणदिवे, रमेश धाईंजे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी बोलताना मिलिंद सरतापे म्हणाले की, माळशिरस तालुक्यातील जवळपास सर्वच गावांमध्ये आ. राम सातपुते यांनी रस्ते, पाणी, सभा मंडप, सौर ऊर्जा दिवे, अभ्यासिका, महापुरुषांच्या पुतळ्यांसाठी निधी आदी माध्यमातून मागासवर्गीय समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम आ सातपुते यांनी केले आहे. आ राम सातपुते यांच्या कामाबाबत आरपीआय व मागासवर्गीय समाज समाधानी असून मागासवर्गीय समाजाचं प्रतिनिधित्व करणारे आ राम सातपुते यांनी समाजाशी आपली असणारी नाळ कायम ठेवली आहे याबाबत आम्ही समाधानी आहे. मात्र ते ज्याप्रमाणे जनता दरबार येऊन गोरगरिबांच्या अडीअडचणी सोडवतात त्याचप्रमाणे त्यांनी आमसभा येऊन सर्वसामान्यांना न्याय द्यावा ही भूमिका आरपीआयचे पश्चिम महाराष्ट्राचे नेते दयानंद धाइंजे यांनी मांडली तर जिल्हा युवा आघाडीचे कार्याध्यक्ष किरण धाइंजे यांनी सांगितले की, आर पी आय गेल्या दहा वर्षापासून भाजपा बरोबर आहे आहे .

अन्न छत्र मंडळास ५० पोती तांदूळ

मोडनिंब : शांतीलाल बागवाले अण्णा यांनी संत सावता माळी सेवाभावी न्यास संचलित संत सावता माळी अन्नछत्र मंडळाला ५१ पोती तांदूळ सप्रेम भेट दिला. याप्रसंगी जि. प. सदस्य भारत आबा शिंदे, अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष बंडू घाडगे, उपाध्यक्ष महादेव तात्या घाडगे, सहसचिव सतीश घाडगे, विशाल घाडगे, अंकुश क्षीरसागर, सुभाष नष्टे, वसंत केदार व इतर मान्यवर उपस्थित होते.

चांदापुरीतील तुषार पाटील याचे ट्रॅक्टर अपघातात निधन

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील तुषार खुर्द पाटील वय २१ या युवकाचा ऊसाने भरलेल्या ट्रॉलीखाली सापडुन दुर्दैवी मृत्यू झाला. ५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता आपला स्वतःच्या मालकीची यंत्रणा असणारी ऊसतोडणी मगरवाडी येथे सुरु होती.

यावेळी ट्रक्टर भरुन आणत असताना उताराला उटी लाव असतानाच तुषारच्या अंगावरुन ट्राली गेल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्याच्या मृत्यू ने चांदापुरी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पिलीव परीसरातील ही अवघ्या दोन

दिवसातील दुसरी घटना या अगोदर बचेरीची श्रध्दा पाटील हिचा ट्रालीखाली सापडुन दुर्दैवी मृत्यू झाला होता त्यानंतर लगेचच ही घटना घडली.

यंदाच्या वर्षी मुबलक चारा तर अन्नधान्याचा पुरवठा समाधानकारक

खरीप व रब्बी हंगामसह मघा नक्षत्राचा पाऊस होणार

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथील ग्रामदैवत श्रीमहा सिध्द देवाची यात्रा ही महाराष्ट्र-कर्नाटक राज्यात शेतीविषयक भाकणूकसाठी अत्यंत प्रसिध्द असून तसेच यंदाच्या पीक-पाणी याचा अंदाज शेतकरी याच भाकणकीतून घेऊन येणाऱ्या वर्षात पिकांची पेरणी करतात. रात्रीच्या भाकणूकीत यंदा खरीप व रब्बी या दोन्ही हंगामात मोठ्या प्रमाणात होईल व जनावरांसाठी मुबलक चारा उपलब्ध होईल तर अन्नधान्याची पिके ही मध्यम असल्याचे संकेत वर्तवण्यात आली आहेत.

दुपारच्या भाकणूकीनंतर त्याच दिवशी रात्री बारा ते एकच्या दरम्यान डोणज (ता.मंगळवेढा जि.सोलापूर) येथील एकबैल व चार पुजारी भंडारकवठे येथील मंदिरात येतात डोणजच्या बैलाचे व पुजारीचे आगमन झाल्यानंतर लगेचच आल्या आल्या महासिध्द देवाच्या पूजारीं यांना तंबाखू दिल्याने यंदा मघा नक्षत्रचा पाऊस मोठ्या प्रमाणात होणार आहे.

रात्रीच्या समयी दोघेही कुंभार बंधु दोन घागर घेऊन तिर्थजल आणण्यासाठी भिमानदीकडे मार्गस्थ होतात.एका घागरीला हिंगारी (खरीप) व दुसऱ्या घागरीला मुंगारी (रब्बी) म्हणतात.चंद्राच्या शीतल प्रकाशात या दोन्ही घागरी तिर्थजलाने भरुन मंदिरात आणून ठेवले. तेली हळद व तेल घेऊन मंदिरात ठेवले. रात्रीच्या समयी डोणजचे पुजारीच्या हस्ते

श्रीमहासिध्द व श्रीअमरसिध्द देवाची महापूजा संपन्न झाली. डोणजचे पुजारी अमरायांच्या अमरलिंगावर भंडारा चढवितात अमरलिंगावरती सहा ते सात इंच भंडारा चढविण्यात आला.महापूजा पूर्ण झाल्यावर अमरायाच्या मंदिरासमोर तीन पुजारी,दोन कुंभार,एक तेली हे सहाजण जेवायला बसल्यानंतर ते सगळेजण समाधानकारक जेवण केल्याने यंदा जनावरांसाठी मुबलक चारा तर नगदी पिके ही भरपूर प्रमाणात उत्पादन होईल, असे संकेत मिळाले आहे तर सामान्यासाठी अन्नधान्य समाधानकारक होईल.

डोणजचे पुजारी जाताना मुंगारी (रब्बी) व हिंगारी (खरीप)चे, घागर उधळून उधळून गेल्याने दोन्हीही रब्बी व खरीप या दोन्ही हंगामात मोठ्या प्रमाणात पाऊस ची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

अमरलिंगाच्या पिंडीवर भंडारा अल्पप्रमाणात ठेवल्याने यंदाच्या वर्षी अन्नधान्य पुरवठा समाधानकारक असेल.

डोणज वरून आलेल्या बैलाने आल्या आल्याच मलमूत्र केल्याने व आणलेल्या कडब्याचे कणीस खल्याने यंदा कमी प्रमाणात ज्वारीचे पिकाचे उत्पादन होईल यावरुन जाणकार मंडळी तर्क-वितर्क होत आहे.

सोलापूर- विजयपूर पंचक्रोशी परिसरात भाकणुकीसाठी प्रसिद्ध असलेल्या विजयपूर जिल्ह्यातील उंब्रज येथे पहाटे चारच्या सुमारास भाकणूक संपन्न झाली. येथे संपन्न झालेल्या भाकणुकीत सर्वसामान्य नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे तसेच येणाऱ्या आगामी दिवसात देश विदेशात मोठ्या प्रमाणात युद्ध होईल तसेच यंदाचा पाऊस मुबलक प्रमाणात होईल.कर्नाटक राज्यात यंदा सत्तेचे कायापालट होणार नसून हेच सरकार स्थिर राहील अशी भाकणूक उंब्रज येथे संपन्न झाली.

पाच न्यायाधीशांची अखेर नियुक्ती

कॉलेजियमच्या शिफारशी 'पीएमओ'कडून मंजूर

✔ सुराज्य/नवी दिल्ली

सर्वोच्च न्यायालयात पाच न्यायाधीशांची शनिवारी नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ३२ झाली असून, अद्याप दोन न्यायाधीशांची पदे रिक्त आहेत. न्यायाधीश नियुक्तींच्या कॉलेजियम पद्धतीवरून न्यायालय आणि सरकारमधील मतभेदांच्या पार्श्वभूमीवर कॉलेजियमने पाठवलेल्या पाच नावांना मंजुरी मिळून या नियुक्त्या झाल्या आहेत.

न्या. पंकज मित्तल (राजस्थान उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती), न्या. संजय कारोल (पाटणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती), न्या. पी. व्ही. संजयकुमार (मणिपूर उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती), न्या. अशनुद्दीन अमानुल्लाह (पाटणा उच्च न्यायालयातील न्यायाधीश) आणि न्या. मनोज मिश्रा (अलाहाबाद उच्च न्यायालयातील न्यायाधीश) या पाच जणांची सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशपदी नियुक्ती झाल्याचे कायदामंत्री किरेन रिजिजू यांनी जाहीर केले. पंतप्रधान कार्यालयाने २ फेब्रुवारीला या नावांना मंजुरी देऊन, ही नावे नियुक्तीच्या मंजुरीसाठी राष्ट्रपती भवनाकडे पाठवली होती.

आज शपथ?

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने १३ डिसेंबरला या पाच जणांच्या नावांची शिफारस केंद्र सरकारकडे केली होती. हे पाचही न्यायाधीश उद्या, सोमवारी पदाची शपथ घेतील, अशी शक्यता सर्वोच्च न्यायालयातील सूत्रांनी वर्तवली. ३४ - सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्तींची मंजूर पदे. ५ - शनिवारी नियुक्त झालेले नवे न्यायमूर्ती. २- न्यायमूर्तींची अद्याप असलेली रिक्त पदे.

सध्या सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीशांसह २७ न्यायाधीश कार्यरत आहेत. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची एकूण पदे ३४ असून, दोन पदे रिक्त आहेत.

या पार्श्वभूमीवर कॉलेजियमने ३१ जानेवारीला न्या. राजेश बिंदाल (अलाहाबाद उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती) आणि न्या. अरविंद कुमार (गुजरात उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती) यांची नावे सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशपदी नियुक्तीसाठी सरकारकडे पाठवली आहेत.

आधी सुचविलेल्या पाच नावांना मंजुरी मिळण्याआधीच कॉलेजियमने तीन दिवसांपूर्वी अनपेक्षितपणे आणखी दोन नावे सरकारकडे पाठवली होती. सर्वसाधारणपणे आधीची नावे मंजूर झाल्याशिवाय कॉलेजियम नवीन नावे सुचवित नाही.

एक-दीड वर्षासाठी निवडणूक का?

राज यांचा पवारांना सवाल

✔ सुराज्य/मुंबई

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी महाविकास आघाडीच्या नेत्यांना पत्र लिहित कसबा आणि चिंचवड येथील पोटनिवडणुका बिनविरोध करण्याची मागणी केली आहे. अंधेरी पोटनिवडणुकीसाठी भाजपाने जसा उमदेपणा दाखवला तसाच आता महाविकास आघाडीच्या नेत्यांनीही दाखवावा असं राज ठाकरे म्हणाले आहेत. तसंच, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या अधिकृत ट्विटर खात्यावरून राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांचा एक जुना व्हिडिओ व्हायरल केला आहे. शरद पवारांच्या या व्हिडीओवरूनच मनसेने महाविकास आघाडीच्या नेत्यांचे कान टोचले आहेत.

आमदार रमेश लटके यांच्या निधनानंतर अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीकरता त्यांच्या पत्नी ऋतुजा लटके यांना महाविकास आघाडीकडून उमेदवारी देण्यात आली होती. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचा दाखला देत येत्या एक-दीड वर्षांतच विधानसभेच्या निवडणुका लागणार आहेत. त्यामुळे एक दीड वर्षासाठी निवडणूक घेण्यापेक्षा या जागेवर बिनविरोध उमेदवार निवडून यावा, अशी मागणी शरद पवारांनी केली होती. १६ ऑक्टोबर २०२२ रोजी शरद पवारांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी हा मुद्दा मांडला होता. याच पत्रकार परिषदेतील शरद पवारांचा बिनविरोधाचा मुद्दा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने अधोरेखित केला आहे. मनसेच्या अधिकृत ट्वीटर खात्यावरून हा व्हीडिओ प्रदर्शित करून शरद पवारांची ही भूमिका महाविकास आघाडीच्या नेत्यानांच मान्य नाही का? असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे.

दरम्यान, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे रविवारी पुणे दौऱ्यावर आहेत. पुण्यात होऊ घातलेल्या पोटनिवडणुकांसाठी मनसे इच्छुक असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. मात्र, या जागांवर बिनविरोध निवडणूक होण्यासाठी राज ठाकरेंनी लेटर बॉम्ब फोडून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. त्यामुळे राज ठाकरेंची ही विनंती महाविकास आघाडीचे नेते मान्य करून महाराष्ट्राची राजकीय संस्कृती जोपासतात की भाजपाला धोबीपछाड देतात हे पाहावं लागेल.

ब्रेक फेल होताच चालकाने मारली उडी

✔ सुराज्य/पुणे

बारामतीच्या मोरगाव मधील एका खासगी क्लासच्या विद्यार्थ्यांना, सहलीसाठी येऊन येलेल्या बसचे ब्रेक अचानक निकामी झाले. बसचे ब्रेक निकामी झाल्याचं लक्षात येताच बस चालकाने रस्त्यावरच्या नागरिकांना सावध करत, चालत्या बसमधून उडी मारून चाकाखाली दगडं टाकून बस थांबवली. चालकाने दाखवलेल्या ह्या प्रसंगावधानामुळं मोठा अनर्थ टळला आहे.

बस वरंधघाटमार्गे रायगड किल्ल्यावर विद्यार्थ्यांना सहलीसाठी येऊन जात असताना पुण्याच्या भोरमधील चौपाटी परिसरात ही घटना घडली. बसमध्ये एकूण ३४ विद्यार्थी होते.

मिळालेल्या माहितीनुसार, मोरगावमधील एका खासगी क्लासच्या विद्यार्थ्यांना सहलीसाठी येऊन निघालेल्या बसचे ब्रेक अचानक निकामी झाले. बसचे ब्रेक निकामी झाल्याचं लक्षात येताच चालकाने रस्त्यावरच्या नागरिकांना सावध करत चालत्या बसमधून उडी मारून चाकाखाली दगडं टाकून बस थांबवली. चालकाने दाखवलेल्या ह्या प्रसंगावधानामुळं मोठा अनर्थ टळला. ही सर्व घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे.

अंधश्रद्धेचे भूत!

आठ कुटुंबांनी घरांची मोडतोड करुन सोडले गाव

✔ सुराज्य/नाशिक

पुरोगामी महाराष्ट्र म्हणून ओळख असलेल्या महाराष्ट्र राज्यात आज ही अंधश्रध्देला खतपाणी घातले जात आहे. नाशिकच्या इगतपुरी तालुक्यात असलेल्या घोटी येथे भुताटकीच्या आरोपामुळे आठ कुटुंबांना आपले राहत्या घराची मोडतोड करत गाव सोडावे लागले आहे. या अंधश्रध्देच्या प्रकाराने इगतपुरी तालुका पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, तालुक्यातील भोरवाडी राहत असलेल्या एका कुटुंबातील आजारी असणाऱ्या बालकाचा मृत्यू झाला होता. भुताटकी केल्यामुळे या बालकाचा मृत्यू झाल्याचा आरोप करीत या परिवारांने गावात आठ कुटुंबांचा छळ सुरू केला हा वाद विकोपाला गेल्यानंतर याबाबत घोटी पोलिसात तक्रारही दाखल करण्यात आली होती. पोलिसांनी संबंधितांना समजावून सांगत त्यांचा गैरसमज दूर करण्याचा देखील प्रयत्न केला मात्र त्यानंतरही संबंधित परिवारांना या आठ कुटुंबांचा छळ सुरूच होता. पोलीस तक्रार देऊनही हा प्रकार सातत्याने घडत असल्याने या वादास कंटाळून या आठ कुटुंबांनी अखेर गाव सोडण्याचा निर्णय घेतला. आपल्या घराची मोडतोड करत पाठीवर संसार घेऊन दुसरीकडे स्थलांतराचा निर्णय घेतला.

या प्रकारामुळे इगतपुरी तालुक्यात खळबळ उडाली आली असून आठ कुटुंबांनी स्थलांतर केल्यामुळे चिंता देखील व्यक्त केली जात आहे. अंधश्रध्देच्या या प्रकाराने राज्यातील अनेक ग्रामीण भागात अंधश्रध्देचे भूत कायम असल्याचे दिसून येत आहे.

स्पाय बलून पाडल्यानंतर चीनचा तीळपापड

✔ **वुहान** : हेरगिरी होत असल्याचा दावा करत अमेरिकेच्या लढाऊ विमानाने चीनचा सिविलिअन एरअशिप पाडला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हे बलून अमेरिकेच्या आकाशात घिरट्या घालत असल्याने अमेरिकेचे जो बायडन यांच्या आदेशानुसार हे बलून पाडण्यात आलं. मात्र, अमेरिकेच्या या कारवाईमुळे चीनने हेरगिरी बलूनबाबत स्पष्टीकरण दिलं आहे.

आम्हांला हा मुद्दा शांतीपूर्ण पद्धतीनं हाताळायचा होता. पण अमेरिकेनं आमचं सिविलियन एअरशिप (हेरगिरी बलून) पाडलं आहे. याचा आम्ही तीव्र शब्दात निषेध व्यक्त करतो. अमेरिकेनं या कारवाईमधून आंतरराष्ट्रीय मानकांचं उल्लंघन केलं आहे. चीन आपल्या सुरक्षेसाठी कटिबद्ध आहे. आम्ही याआधी अमेरिकेसोबत याबाबत अनेकदा चर्चा केली. सिविलियन एअरशिप चुकून अमेरिकेच्या हवाईहद्दीत गेल्याचं आम्ही सांगितलं होतं. हा एक फक्त अपघात होता. अमेरिकेच्या सैन्याला या बलूनचा कोणताही धोका नव्हता हे आम्ही याआधीही सांगितलं होतं, असं चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून सांगण्यात आलं आहे.

पाकिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांचे निधन

✔ **कराची** : पाकिस्तानचे माजी राष्ट्रपती जनरल परवेझ मुशर्रफ यांचे रविवारी निधन झाले. पाकिस्तानच्या वृत्तांनुसार ही माहिती समोर आली असून दुबईतील रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते गेल्या अनेक दिवसांपासून अमाइलॉइडोसिस आजाराशी लढा देत होते. दिर्घ काळ रुग्णालयात राहिल्यानंतर वयाच्या ७९ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली.

गेल्या सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीपासून परवेझ मुशर्रफ दुबईतील अमेरिकन रुग्णालयात उपचार घेत होते. १० जून २०२२ रोजी त्यांच्या कुटुंबियांकडून एक पत्रक जारी करण्यात आलं होतं. त्यानुसार, त्यांची प्रकृती चिंताजनक असून अनेक अवयव निकामी झाले होते. परंतु ते व्हेंटिलेटवर नसल्याचंही सांगण्यात आलं होतं. तसंच त्यावेळी ते ३ आठवड्यांपेक्षा जास्त काळ रुग्णालयात दाखल होते.

रेल्वेत नोकरीच्या आमिषाने दहा जणांना दहा लाखांचा गंडा

✔ **पुणे** : रेल्वेत नोकरी देण्याच्या आमिषाने दहा जणांची दहा लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपींनी रेल्वेत नोकरीच्या आमिषाने अनेकांची फसवणूक केल्याचा संशय बंडगार्डन पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणी अभिषेक विजय तांबे (रा. कात्रज), योगेश संतराम माने, निलेश संतराम माने (रा. ताडीवाला रस्ता) यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एकाने बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार आणि आरोपी ओळखीचे आहेत. पुणे रेल्वे स्थानकातील आरएमएस विभागात (रेल्वे मेल सर्व्हिस) नोकरी लावण्याचे आमिष आरोपींनी दाखविले होते. फिर्यादी आणि त्याच्या नातेवाईकांकडून नोकरी लावण्याच्या आमिषाने आरोपींनी दहा लाख ८१ हजार रुपये उकळले. त्यांना रेल्वेचे बनावट नियुक्तीपत्र दिले. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर या प्रकरणी तक्रारदाराने बंडगार्डन पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

राजस्थानमधील मंत्र्याविरोधात अपहरणाचा गुन्हा

✔ **राजस्थान** : राजस्थानमधील राज्यमंत्री राजेंद्र सिंह गुढा यांच्यावर अपहरणाच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुढा काँग्रेसचे नेते सचिन पायलट यांच्या गटातील नेते मानले जातात. याच कारणामुळे गुढा यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यावरून येथे राजकारण रंगले आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर राजेंद्र सिंह गुढा यांनी राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्यावर टीका केली आहे. या निमित्ताने काँग्रेसमधील अंतर्गत वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आल्याचे म्हटले जात आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातर्फे २८ कोटींची मदत

✔ सुराज्य/मुंबई

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाने रुग्ण सेवेत उत्कृष्ट कामगिरी करून राज्यातील हजारो रुग्णांच्या जीवनात निरामय आरोग्याचा प्रकाश आणला आहे. आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखत या कक्षाने अवघ्या सहा महिन्यांत कक्षाकडून ३६०० रुग्णांना एकूण २८ कोटी ३२ लाख रुपयांची मदत दिली आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पहिल्या दिवसापासून या योजनेचे मूळ संकल्पक तथा कक्ष प्रमुख मंगेश चिवटे आणि त्यांच्या सर्व टीमने रुग्णसेवेत झोकून दिले आहे.

त्यामुळेच पहिल्याच जुलै महिन्यात १९४ रुग्णांना ८३ लाखांची मदत देण्यात आली. नंतर ऑगस्ट महिन्यात २७६ रुग्णांना १ कोटी ४० लाख, सप्टेंबर महिन्यात ३३६ रुग्णांना १ कोटी ९३ लाख, ऑक्टोबर महिन्यात २५६ रुग्णांना २ कोटी २१ लाख, नोव्हेंबर महिन्यात ५२७ रुग्णांना ४ कोटी ५० लाख, डिसेंबर महिन्यात ८ कोटी ५२ लाख, जानेवारी २०२३ मध्ये विक्रमी ८ कोटी ८९ लाख रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे.

जानेवारी महिन्यात रुग्णांना देण्यात आलेल्या विक्रमी मदतीबाबत बोलताना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी सांगितले की, 'मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या निकषात बदल करून काही खर्चिक उपचार असणाऱ्या आजारांचा समावेश नव्याने करण्यात आला आहे. जास्तीत जास्त गरजू रुग्णांना सहाय्यता करता यावी यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सुचनेनुसार नवीन आजारांचा समावेश करण्यात आला. याचा सकारात्मक परिणाम म्हणून नव्याने समाविष्ट या आजारांच्या अनेक रुग्णांना मदत उपलब्ध झाली आहे. यामुळे निधीच्या वितरणात वाढ झाली आहे.'

विनोद कांबळीविरोधात पत्नीची तक्रार

✔ **मुंबई** : माजी भारतीय क्रिकेटपटू विनोद कांबळी पुन्हा एकदा वादात सापडण्याची शक्यता आहे. विनोद कांबळीच्या पत्नीने त्याच्याविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. परगुती वादातुन मद्यधुंद अवस्थेत पत्नीला मारहाण केल्यामुळे विनोद कांबळीविरोधात त्याच्या पत्नी अँड्रियाने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

२०१९ मध्ये मीच मुख्यमंत्री होणार होतो : खडसे

✔ सुराज्य/मुंबई

भाजपाचे माजी नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानपरिषदेचे आमदार एकनाथ खडसे यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केले आहे. जळगाव येथे पत्रकार परिषदेला संबोधित करत असताना त्यांनी आपल्यावर झालेली कारवाई कट कारस्थानाचा भाग होती, असा आरोप पुन्हा एकदा केला आहे. मात्र यावेळी त्यांनी केलेल्या विधानामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. २०१९ साली जेव्हा निवडणुका झाल्या, तेव्हा मुख्यमंत्रीपदाचा प्रमुख दावेदार म्हणून माझे नाव पुढे येत होते., असा गौप्यस्फोट एकनाथ खडसे यांनी केला.

एकनाथ खडसे म्हणाले, '२०१९ च्या निवडणुकीनंतर माझेच नाव मुख्यमंत्रीपदासाठी घेतले जात होते. मात्र, त्याआधीच २०१६ रोजी मला राजीनामा द्यावा लागला होता. माझ्यावर खोटे आरोप करुन मला राजीनामा देण्यासाठी भाग पाडले गेले. माझ्याविरोधात घडवून षड्यंत्र रचले गेले. ज्या भूखंडाचा आरोप माझ्यावर ठेवला गेला, त्या भूखंडाशी माझा दुरान्वये संबंध नाही. मी तो जमीन व्यवहार केलेला नाही. मी ती जमीन पाहिलेली देखील नाही. मी फक्त त्या जमीनीबाबत बैठक घेतली होती. त्याचे प्रोसिडिंग तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रद्द केले होते. केवळ बैठक घेतली म्हणून माझ्या परिवाराची ईडी चौकशी करण्यात आली. त्याआधी लाचलुचपत विभागाने त्याची चौकशी करण्यात आली होती. ईडीच्या चौकशीसाठी माझे जावई गेले असता त्याचदिवशी त्यांची अटक करण्यात आली. मला कोर्टाने संरक्षण दिले असल्यामुळे माझी अटक टळली होती.

टीव्ही लावला की आमच्यातील साहित्य ओसंडून वाहते

साहित्य संमेलनात बोलताना फडणवीसांचे मिश्किल विधान!

मराठी भाषेने आपलं एक वेगळेपण जपलंय...

आज आपल्या मराठी भाषेत गुराखी, झाडीपट्टी, विद्रोही, दलित, अशी विविध साहित्य संमेलन होत असतात. पण ही सर्व साहित्य संमेलनं आपल्या विचारांना आणि अभिव्यक्तीला समृध्द करतात त्यामुळे मराठीतली साहित्य संमेलनाची जी परंपरा आहे. ती परंपरा अतिशय मोलाची आहे. इतर भाषेत इतकी साहित्य संमेलनं होताना दिसत नाहीत. मराठी भाषेने आपलं एक वेगळेपण जपलं आहे, असेही ते म्हणाले.

✔ सुराज्य/मुंबई

९६वे अखिल भारतीय साहित्य संमेलन वर्धा येथे सुरू आहे. रविवारी या साहित्य संमेलनाचा शेवटचा दिवस आहे. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी साहित्य संमेलनाला संबोधित केले. यावेळी बोलताना त्यांनी विदर्भ साहित्य संघाला राज्य सरकारतर्फे १० कोटी रुपये देणगी देण्याची घोषणा केली. तसेच राजकीय नेते ही साहित्यिकांची प्रेरणा असतात, असं मिश्किल विधानही त्यांनी यावेळी केलं, यावरून उपस्थितांमध्ये हशा पिकला होता.

विदर्भ साहित्य संघाला आम्ही १० कोटी देणगी

यंदा विदर्भ साहित्य संमेलनाला १०० वर्ष पूर्ण होत आहे. विदर्भ साहित्य संघ अनेक लोकांच्या मेहनतीतून उभा राहिला आहे. अनेक अडचणींचा सामना त्यांनी केला. त्यामुळे या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनाच्यावतीने विदर्भ साहित्य संघाला आम्ही १० कोटी रुपये देणगी स्वरुपात देण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

मराठीबाबत भविष्यातील चिंता दूर होतील

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांनी मराठी भाषेबाबत ज्या चिंता व्यक्त केल्या आहेत, त्या योग्य आहेत. गेल्या काही वर्षात आपल्या भाषेचा जो ऱ्हास झाला आहे. त्याचं एकमेव कारण म्हणजे आपण आपल्या भाषेला ज्ञानभाषा करू शकलो नाही. आपला सर्व अभ्यासक्रम हा इंग्रजीत होता. त्यामुळे १०व्या वर्गानंतर मुलांचा मराठीकडचा ओढा कमी झाला. मात्र, पंतप्रधान मोदींनी जे नवीन शिक्षण धोरण आणले आहे, त्या धोरणामध्ये सर्व प्रकारचं शिक्षण मराठी देता येणार आहे. त्यामुळे मराठीबाबत भविष्यातील ज्या चिंता आहेत, त्या दूर होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

नेमकं काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?

माझ्यासह अनेक लोकांना प्रश्न पडतो की साहित्याच्या व्यासपीठावर राजकीय नेते काय करतात? हा प्रश्न योग्यही आहे. याबाबत मला असं वाटतं की राजकीय नेते अनेक साहित्यिकांची प्रेरणा असतात. कारण आम्ही नसलो, तर व्यंगचित्र काढणाऱ्यांना कामच उरणार नाहीत. आमच्यात शीघ्रकवी आहेत, आमच्या वमक जुळवणारे कवी आहेत, आमच्यामध्ये स्क्रिप्ट लिहिणारे लोकं आहेत, आमच्यात स्टोरी तयार करणारे लोकं आहेत. तुम्ही सकाळी ९ वाजता टीव्ही लावला, की आमच्यातील साहित्य ओसांडून वाहताना पाहू शकता. त्यामुळे साहित्य संमेलनाच्या अतिशय पवित्र मंचावर आम्हाला थोडीशी जागा मिळते, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच आम्ही इतके हुशार आहोत, की थोडीशी जागा मिळाली की व्यापून कशी टाकायची हे आम्हाला चांगलं माहिती आहे, अशी मिश्किल टीप्पणीही त्यांनी केली.

काय म्हणतयं? पॉलिटिक्स

पुरुषोत्तम कुलकर्णी

'भय' इथले संपत नाही!

'काय म्हणतंय पोलिटिकल' या सदरात मागच्या आठवड्यात सोलापुरातील काँग्रेस पक्षाविषयीची अवस्था मांडली होती.त्याबद्दल सर्वत्र त्याचे स्वागत झाले.आपण वास्तव मांडल्याची प्रतिक्रिया सर्वस्तरातून आली. 'रोग कमरेला तर इंजेक्शन पखालीं'ला, अशी एक मराठीत म्हण आहे.शहकाटशहचे राजकारण करताना राजकारण्यांकडून असा प्रकार सर्रासपणे होत असतो. काँग्रेसविषयी लिहिण्याचा एकच हेतू होता, तो म्हणजे या पक्षाला पुनर्वैभव लाभावे. आपण सत्य कथन केले. पुढे काय करायचे ते श्रेष्ठींनी ठरवायचे आहे. आता दुसरा मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे.तो म्हणजे आगामी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे भवितव्य काय असणार? २०१४आणि २०१९ अशा दोन निवडणुकांमध्ये काँग्रेस सपाटून मार खाल्ली.कित्येक वर्षांचा राजकारण व समाजकारणाचा अनुभव तसेच कुणासाठी काय काय केले नाही? असे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांना हे दोन पराभव पचवावे लागले.या पराभवाचा धक्का कुणालाही सहन झाला नाही पण करणार काय? मतदारांच्या मानसिक शक्तीपुढे कुणाचे काही चालत नाही.२०२४चे घोडामैदान जवळ येत आहे. केवळ दीड वर्षांचा काळ राहिला आहे.तेव्हा या निवडणुकीत काँग्रेसचा उमेदवार कोण? ही जागा जिंकण्यासाठी काँग्रेसकडची नवी रणनीती काय असेल? नियोजन काय आहे? विशेष म्हणजे कॅन्डिडेट कोण? घोडामैदानाची तयारी काय? असे प्रश्न विचारले जावू लागले आहेत.

काँग्रेस भवनमधून तशी तयारी तर बिलकूल दिसत नाही. तिथे सन्नाटाच पहायला मिळत आहे. पण जी चर्चा कानावर पडते आहे,ती लोकांपर्यंत आणि कार्यकर्त्यांपर्यंत पोहचवणे आवश्यक वाटते.दोनदा पराभव झाल्याने सुशीलकुमार यांनी पुन्हा उभे राहावे काय? हा एक गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे.काँग्रेसमधील एक गट म्हणतो की- वयोमान पाहाता त्यांनी निवडणूक लढवू नये.आता 'पितामह'ची भूमिका त्यांनी वठवावी. दुसऱ्या गटाचा मतप्रवाह वेगळाच. नाही... शिंदेसाहेबच उभारले पाहिजेत. शहर अध्यक्ष चेतन नरोटे यांच्या उपस्थितीत काही कार्यकर्त्यांनी निवेदन देवून शिंदे यांनीच निवडणूक लढवढ्याचा आग्रह धरला. निवडणूक लढवायची की नाही याविषयी सुशीलकुमार यांच्याकडूनही स्पष्ट भूमिका सांगितली जात नाहीय. होय किंवा नाही? कदाचित त्यांच्या मनात असेलही पण मागच्या दोन पराभवाचा अनुभव पाहाता उभा राहिलो तर काय होईल? ही भीती त्यांना बहुधा लागून असावी.कारण राजकारणात मुरब्बी असणारे सुशीलकुमार मतदारांची नाडी ओळखण्यात तसे तरबेज आहेत.

ताईंचेही तळ्यात-मळ्यात...

सुशीलकुमार आणि त्यांची कन्या आ.प्रणितीताई यांच्या खेरीज एसटीचा तगडा आणि निवडून येवू शकणारा एसटी कॅटेगिरीचा कॅन्डिडेट सध्यातरी दिसत नाही.सुशीलकुमार यांचा नकार आला तर प्रणितीताईंखेरीज दुसरा उमेदवार नाहीच. अन्य उमेदवाराची तशी चर्चाही नाही. पण ताईंचीही भूमिका 'तळ्यात – मळ्यात' असल्याचे दिसते. कारण लोकसभा मतदार संघाचा त्यांचा झंझावती दौरा थंडावला आहे. काही महिन्यांपूर्वी त्यांनी मतदार संघ पिंजून काढला होता. त्यांच्या या हालचाली पाहाता आगामी उमेदवार म्हणून त्यांच्या नावाची चर्चा सुरू झाली होती परंतु त्यांचे मन 'शहरमध्य'अडकले आहे. आपल्या हक्काचा आणि लोकांनी दिलेल्या प्रेमाचा मतदार संघ सोडून फुफाट्यात कशाला जायचे? अशी एक चिंता ताईंना लागून असल्याची चर्चा आहे.'मोदी फॅक्टर'ची भीती ताईंच्या समर्थकांकडून दबक्या आवाजात व्यक्त केली जातेय.

स्टॅटेजी असली पाहिजे...

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने या लोकसभा मतदार संघात आतापासूनच नियोजन करायला हवे.दोनदा पराभव झाल्याने पक्षाची स्थिती नाजूक बनली आहे.तेव्हा ही पोकळी पक्षश्रेष्ठींना भरून काढावी लागणार आहे. सुशीलकुमार हे निवडणूक लढवणार नसतील तर ताईंनी लढवली पाहिजे.दोघांचीही तयारी नसेल तर तसा उमेदवार त्यांनी निवडायला हवा.मतदारांपुढे उमेदवाराचा चेहरा आताच पुढे आणला पाहिजे. कार्यकर्ते शोधावे लागतील. पदाधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपवायला हवी.मोदी सरकारच्या अपयशाचे मुद्दे आताच शोधायला हवेत. ऐनवेळी उमेदवार ठरवला गेला तर मोठा गोंधळ होईल.लढाई लढावीच लागणार आहे. तेव्हा पक्षाची स्ट्रॅटेजी आताच ठरवावी लागेल,असे पक्षातील जाणकार सांगतात.

राष्ट्रवादी काँग्रेसचा उपद्रव...

मोदी फॅक्टरची जशी भीती काँग्रेसला लागून आहे,तशी राष्ट्रवादी काँग्रेसच्या त्रासाची या पक्षाला चिंता लागून आहे. दोनदा पराभव झाल्यामुळे सोलापूरची जागा आता राष्ट्रवादी काँग्रेसला द्यावी, अशी मागणी डोके वर काढत आहे. काही दिवसांपूर्वी काँग्रेस सोडून राष्ट्रवादीत गेलेल्या एका घोळक्याने सुधीर खरटमल यांचे नाव समोर आणले गेले आहे. राष्ट्रवादीत तशी चर्चा नाहीच. जागा वाटपात काय होईल ते होईल, असे राष्ट्रवादीचे निष्ठावंत नेते म्हणतायेत. राजकारणात धक्के देण्याचे उद्योग होत असतात. हा एक उपद्रव काँग्रेसला सहन करावा लागेल,असे दिसते.

दुसरा विषय- काँग्रेसमध्ये जसा सन्नाटा आहे, तसा तो भाजपमध्येही पहायला मिळतो. भाजपचे कार्यालय कोठे आहे? तिथे काय कामकाज चालते? भाजपचा शहर अध्यक्ष कोण? जिल्हाध्यक्ष कोण? सत्तेच्या धुंदीत असणाऱ्या भाजपच्या लोकप्रतिनिधींचे नेमके काय चालले आहे? हा संशोधनाचा विषय आहे.निवडणुकींची तयारी इथेही दिसत नाही.भाजपमध्येही उमेदवारीचा गोंधळ माजणार आहे.कारण विद्यमान खासदार डॉ.जयसिद्धेश्वर महास्वामी यांच्या जात प्रमाणपत्राचा वाद न्यायालयात प्रलंबित आहे. त्याचा निकाल केव्हा लागेल? याची शाश्वती कुणालाच देता येणार नाही.त्यामुळे पुन्हा त्यांनाच उमेदवारी द्यायची की नाही? असा पक्ष श्रेष्ठींपुढे संभ्रम आहे. या अग्निदिव्यातून महास्वामीजी सत्य समोर आणून बाहेर पडले तर नंबर त्यांच्याच. अन्यथा श्रेष्ठींना दुसरा उमेदवार शोधावा लागणार आहे. महास्वामीजी अग्निपरीक्षेतून बाहेर पडल्याखेरीज श्रेष्ठी त्यांच्याबाबतीत कुठली रिस्क घेतील,असे वाटत नाही,असे एक ज्येष्ठ नेता सुराज्यशी बोलताना म्हणला. अनुसुचित जाती या कॅटेगिरीतील अन्य स्थानिक उमेदवार सध्यातरी पक्षाकडे आहे,असे दिसत नाही.नवखा उमेदवार आणून चालणार नाही. तेव्हा महास्वामीजी बाजूला पडले तर भाजपपुढे माजी खासदार अमर साबळे यांचा पर्याय असू शकतो.२०१९ च्या निवडणुकींपूर्वी साबळे यांनी सोलापूरशी नाळ जोडली होती.निवडणूक लढवण्याची त्यांनी तयारी केली होती.ठिकठिकाणी त्यांचे दौरेही सुरू होते परंतु भाजपच्या स्थानिक नेत्यांना साबळे मान्य नव्हते. त्यातूनच महास्वामीजींना ध्यानीमनी नसताना लॉटरी लागली.

साबळे हे संघाचे व भाजपचे निष्ठावंत नेते आहेत. त्यांनी पदांची फारशी अपेक्षा केलेली नाही. त्यांच्याकडे वक्तृत्व आहे.काम करण्याची पद्धतही आहे.

लोकांमध्ये मिसळणारा नेता म्हणून त्यांची खासियतही आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे साबळेंसाठी अनुकूल आहेत.त्यांनी मनावर घेवून साबळेंना उमेदवारी दिली तर स्थानिक नेत्यांना व कार्यकर्त्यांना निमूटपणे त्यांचे काम करावे लागेल, असा सूर भाजपमधून कानावर पडतो आहे. सोलापूरच्या जागेवर लक्ष ठेवून माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे हेही इच्छुक आहेत.त्यांनी स्तंभ व लेख लिहून मोदी सरकारची कामगिरी लोकांपुढे मांडत आहेत पण ढोबळे हे स्थानिक नेत्यांच्या पचनी पडतील की नाही कोणास ठाऊक? माजी खासदार शरद बनसोडे यांना संधी होती परंतु ते 'मुंबई आमचीच'मध्ये रमत राहिले. सोलापूरकडे त्यांनी लक्ष दिले नाही. सोलापुरात भाजपला गटबाजीचा शाप लागला आहे. तो घालवण्यासाठी श्रेष्ठींनी देखील खूप मेहनत घेतली पण त्यांचेही हात टेकले आहेत. उमेदवार मीच ठरवणार,अशी अहमहमिका पक्षात बळावणार आहे. त्यामुळे नवा उमेदवार ठरवताना श्रेष्ठींची दमछाक होईल, असे दिसते. निवडणूक तोंडावर आलेली असताना प्रदेश आणि स्थानिक पातळीवर कुठल्याच हालचाली दिसून येत नाहीत. काँग्रेसप्रमाणे भाजपच्या गोटातही उमेदवार निवडीचे भय आहे.

भाजपचे लॉजिक...

भाजप नेत्यांच्या डोक्यात जे 'लॉजिक' असते, त्याला तोड नाही. भाजपपुढे सध्या उमेदवारीचा विषय नाही. कारण निवडणुकीच्या तोंडावर देशात समान नागरी कायदा आणला जाणार आहे. हा कायदा आल्यानंतर आरक्षण आपोआपच उठणार आहे.समजा असे झाले तर भाजपमधून लिंगायत उमेदवाराचे नाव पुढे येईल,असे हा नेता म्हणाला.जर आरक्षण कायम राहिले तर साबळेंशिवाय पर्याय नाही,असेही तो म्हणतो. गंमत अशी आहे की- मोदी सरकारने डिसेंबर २०१९मध्ये एक महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. देशातील लोकसभा व राज्यांमधील विधानसभेसाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी असलेल्या आरक्षणाची मुदत दहावर्षांनी वाढवली आहे. म्हणजेच २०२९ पर्यंत या आरक्षणाचा हक्क अबाधित असणार आहे.

नीरा-देवधरच्या पाण्यावरुन श्रेयवादाची लढाई

संजय पाटील

मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत तब्बल ३ हजार ९७६ कोटी ८३ लाख रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता दिली असून शिंदे-फडणवीस सरकारच्या या करणीमुळे नीरा देवघरचे पाणी माळशिरसच्या अवर्षणग्रस्त भागात फिरणार आहे. त्यामुळे या भागाचा दुष्काळ हटणार आहे. खा रणजितसिंह नाईक निंबाळकर हे हा प्रश्न मी सोडवल्याचा दावा केला तर आ रणजितसिंह मोहीते पाटील यांनी सुध्दा यासाठी केलेला पाठपुरावा सध्या सोशल मीडियावर फिरत आहे. त्यामुळे नीरा - देवधरच्या पाण्यावरुन दोयांच्या व कार्यकत्यांमधे जोरदार श्रेयवादाची लढाई सोशल मीडियावर दिसून येत आहे. पण काही असो या महत्वाकांक्षी निर्णयाचा भाजपला येणाऱ्या निवडणुकीत फायदा होईल, अशी सध्या चर्चा सुरु आहे.

गेल्या ३५ वर्षांपासून नीरा - देवधरचा पाणीप्रश्न चर्चेत आहे. १९८४ साली तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी ही योजना सुरु केली. मात्र निधीवाचून ती रखडली. त्यानंतर १९९५ साली युती सरकारच्या काळात याला मान्यता भेटली तर २००१ मध्ये बारा टीएमसी क्षमतेचे धरण बांधून तयार झाले पण यातील पाणी वीर धरणात सोडल्यामुळे कार्यक्षेत्राबाहेरील गावांना याचा लाभ होत राहिला. यावरुन प्रत्येक निवडणुकीत पाण्याचे राजकारण निवडणुकीत आश्वासने यापेक्षा वेगळे काही मतदारांच्या हाती पडले नाही.

माळशिरस तालुक्यासह माढा मतदारसंघाचे नेतृत्व अनेक दिग्गजांनी केले. मात्र, हा प्रश्न कोणी तडीस नेला नाही. महाविकास आघाडी सरकारने सुध्दा याकडे फारसे लक्ष दिले नाही. यावर नीरा - देवधर संघर्ष समिती यामध्ये बाळासाहेब सरगर त्यानंतर शिवराज पुकळे यांनीही आंदोलनाच्या माध्यमातून यासाठी प्रयत्न केले. आ. राम सातपुते, आ रणजितसिंह मोहिते पाटील यांनी महाविकास आघाडी सरकार असताना यावर सातत्याने आवाज उठविला. त्यानंतर महाविकास आघाडी सरकार जाऊन भाजपचे सरकार सत्तेत आल्यानंतर माढा मतदारसंघाचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आ रामभाऊ सातपुते, आ रणजितसिंह मोहीते पाटील यांनी यावर आवाज उठविला तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे सातत्याने प्रयत्न केले व ३ हजार ९७६ कोटी ८३ लाख रुपयांची तिसरी प्रशासकीय मान्यता मिळवली. असे असली तरी सध्या राज्याच्या तिजोरीत सध्या खडखडाट असल्याचे बोलले जात आहे. यामुळे माळशिरस तालुक्यातील २२ गावातील नागरिकांना शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे व माळशिरस तालुक्यातील सुमारे १० हजार ९७० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. यामुळे या पश्चिम भागातील नागरिकांमध्ये सध्या आनंदाचे वातावरण पसरले आहे. मात्र यावरुन भाजप नेत्यांनमध्येच श्रेय वादाची लढाई रंगली आहे खा रणजितसिंह नाईक निंबाळकर आणि आ रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या कार्यकर्त्यांमध्ये श्रेयवादाची लढाई सोशल मीडियावर सुरू आहे.

मनसेच्या पदाधिकाऱ्यांची बेचैनी

उल्हास पाटील

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून मनसेचे माढा तालुक्याचे पदाधिकारी व कार्यकर्ते पक्षाला सोडचिठ्ठी देण्याच्या तयारीत असून कुर्डुवाडी शहरात गेल्या दोन तीन वर्षात मनसेने नगरपालिकेतील सत्ताधारी पक्षाच्या विरोधात विविध निवेदने व आंदोलने करुन जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे तसेच पक्ष मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले. परंतु गेल्या चार- सहा महिन्यांत विविध आंदोलनाद्वारे जनतेचे प्रश्न सातत्याने मांडणारे मनसैनिक बॅकफूटवर गेल्याचे पहायला मिळत आहे.

कुर्डुवाडीच्या राजकारणाची खासीयत म्हणा की खोड , विरोध करणाऱ्यांचा विरोध फार काळ टिकत नाही किंवा त्यांचा विरोध फार काळ टिकू दिला जात नाही. त्याप्रमाणे येथील कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांच्यामध्ये उत्साह संचारला असताना ऐन निवडणुकीच्या तोंडावर पक्षातील अंतर्गत कुरघोडीमुळे पक्षात दुफळी निर्माण झाल्याचे पहावयास मिळत आहे. पक्षवाढी आधीच पक्षाला फुटीचे ग्रहण लागले की काय, असे दिसत आहे. पदाधिकारी निवड किंवा बदल पक्षातील कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन केले पाहिजे.पण येथील तालुकाध्यक्ष व जिल्हा उपाध्यक्ष हे पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता त्यांच्याशी चर्चा न करता जुन्या पदाधिकाऱ्याना वगळून नव्या पदाधिकाऱ्यांची नेमणूक करत आहेत.

याबाबत जिल्हाध्यक्षांना कल्पना देऊनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. कुर्डुवाडीच्या पदाधिकाऱ्यांची नेमणूक तेथील कार्यकर्ते व पूर्व पदाधिकारी यांना विचारात न घेता परस्पर कुर्डुवाडीच्या पदाधिकाऱ्यांची नेमणूक ही टेंभुर्णी मध्ये केली जाते. पक्षातील अशा अंतर्गत कुरघोड्या व राजकारणाला कंटाळून नाराज पदाधिकारी पक्षातून बाहेर पडण्याच्या मनस्थितीत आहेत. शेवटी आपल्या पक्षात जे मानाचे स्थान आहे, ते बाहेर मिळणार नाही. हे कोणी एकमेकांकडे बघून आले नाहीत तर राजसाहेबांकडे बघून आलेले कार्यकर्ते आहेत. त्यामुळे हे कुठेही जाणार नाहीत, याची खात्री आहे. त्यांचा पण विचार करु. नियोजनबद्ध निवडी होणार असल्याचे मनसेचे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यावर मनसेचे अमित ठाकरे यांच्या दौऱ्यामध्ये कोणते कोणते निर्णय झाले हे अद्यापही समोर आले नाही. यामुळे अद्यापही मनसे पदाधिकाऱ्यातून शंका व्यक्त होत आहे. तर त्यांना पाठबळ मिळणार का? याबाबतही चिंता वाटू लागली आहे.

'तम तम मंदी'तील तीन आमदार; कोण होणार नामदार?

अजित उंब्रजकर

शिंदे-फडणवीस सरकार येऊन ७ महिन्यांचा कालावधी लोटला आहे. सरकारचा पहिला मंत्रिमंडळ विस्तार झाला आहे. आता अधिवेशनापूर्वी फेब्रुवारी अखरेपर्यंत दुसरा मंत्रिमंडळ विस्तार होण्याच्या चर्चा पुन्हा सुरू झाल्या आहेत. पश्चिम महाराष्ट्रातून विनय कोरे (कोल्हापूर), विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर), सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) हे तीन लिंगायत समाजाचे आमदार निवडून आले आहेत. त्यामुळे या विस्तारात लिंगायत समाजाच्या कोणत्या नेत्याला मंत्रिपद मिळणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तिन्ही आमदारांनी आपापल्यापरीने मंत्रिपदासाठी जोरदार लॉबिंग सुरू केले आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात तम तम तीन आमदार आणि मंत्रिमंडळ विस्तारात कोण होणार नामदार अशा पोस्ट सोशल मीडियावर फिरत आहेत.

विनय कोरे

पश्चिम महाराष्ट्रात लिंगायत समाजाचे तीन आमदारांमध्ये सोलापूरचे जावई तथा जनसुराज्य पक्षाचे अध्यक्ष विनय कोरे हे कोल्हापूर जिल्ह्यातून प्रतिनिधित्व करतात. ते कोल्हापुरातून आमदार असले तरी ते सोलापूरचे जावई आहेत. सोलापूर शहरात त्यांचे राजकीय वजन चांगले आहे. २००७ साली त्यांच्या जनसुराज्य पक्षाचे ४ नगरसेवक हे भाजपचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या शहर उत्तर मतदारसंघात निवडून आले होते. याचबरोबर ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही विश्वासू मानले जातात. राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीत त्यांना भाजपला साथ दिली होती. दुसरीकडे कोल्हापुरात भाजपची ताकद कमी आहे. त्यामुळे खा. धनंजय महाडिकांच्या जोडीला आणि हसन मुश्रीफ आणि बंटी पाटील यांच्या तोडीस तोड नेता असलेल्या विनय कोरे यांना मंत्रीपदाची संधी मिळू शकते, अशी चर्चा आहे.

आ. विजयकुमार देशमुख

मंत्रिपदासाठी तिसरे नाव माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांचे देखील आहे. गेल्यावेळी पश्चिम महाराष्ट्रात लिंगायत समाजाचा एकही आमदार नसल्याने विजय देशमुख यांचा मार्ग मंत्रिपदासाठी सुकर झाला होता. मात्र आता विनय कोरे व आ. सचिन कल्याणशेट्टी हे दोघेही आमदार असल्याने यंदा देशमुख यांना दोन प्रतिस्पर्धी मिळाले आहेत. त्यामुळे देशमुखांना मंत्रिपदाची संधी मिळणे पूर्वीप्रमाणे सोपे राहिले नाही. मात्र, त्यांनी मंत्रिपदासाठी फिल्डिंग लावल्याची चर्चा आहे. आगामी काळात सोलापूर महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणूक तसेच विधान परिषद निवडणूक होत आहे. गतवेळी या तिन्ही निवडणुकीत आ. विजयकुमार देशमुखांची भूमिका महत्वाची ठरली होती. त्यामुळे तेही मंत्रिपदाच्या शर्यतीमध्ये असणार यात शंका नाही.

सचिन कल्याणशेट्टी

लिंगायत समाजातील दुसरे नाव आमदार म्हणजे सचिन कल्याणशेट्टी. सध्या आ. कल्याणशेट्टी देवेंद्र फडणवीस यांच्याबरेच जवळ गेले आहेत. माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचा पराभव करत ते निवडून आले आहेत. गोवा विधानसभा निवडणुकीत त्यांनी फडणवीस यांच्यासोबत काम केले आहे. या कामगिरीचे बक्षीस म्हणून त्यांना सोलापूर जिल्ह्याचे अध्यक्षपद देण्यात आले आहे. जिल्ह्यातील निर्णय प्रक्रियेत सध्या कल्याणशेट्टी आहेत. एक युवा नेता म्हणून कल्याणशेट्टी यांचे नाव देखील मंत्रिपदाच्या शर्यतीत आहे. त्यांना जिल्हाध्यक्षपद मिळाले आहे. त्यामुळे मंत्रिपद मिळेल की नाही अशी चर्चा जिल्ह्यात सुरू आहे. असे असले तरी त्यांनी फडणवीसांकडे जोरदार लॉबिंग सुरू केले आहे. त्यांना मंत्रिपद मिळाले तर जिल्ह्यातील ते सर्वात युवा मंत्री ठरणार आहेत.

नुकतेच मुंबई येथील आझाद मैदानावर विविध मागण्यांसाठी लिंगायत समाजाचा मोर्चा काढण्यात आला होता. देवेंद्र फडणवीस यांनी या मोर्चाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी विनय कोरे यांच्याकडे दिली होती तसेच आ. विजय देशमुख आणि आ. सचिन कल्याणशेट्टी यांनाही या मोर्चात सहभागी होण्यास सांगितले होते. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्तारात लिंगायत समाजाचा विचार निश्चितच फडणवीस यांच्याकडून होणार, असे मानले जात आहे. आता ते कोणाच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ टाकणार याची उत्सुकता लागली आहे.